मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६, ९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस



ऐन गणेशोत्सवात कर्जतमध्ये भीषण तिहेरी हत्याकांड
पान ५

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, सोमवार, ९ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ८० | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये




मुंबई : श्री गणरायांच्या आगमनाने अवघी मुंबापुरी चैतन्यमय झाली आहे. मुंबईचा गिरणगाव तर बाप्पाच्या येण्याने आनंदमयी झाला आहे. 'काळाचौकीचा मयुरेश्वर' म्हणून ओळखला जाणारा भव्यदिव्य गणराया यंदा वासुदेवाच्या रूपात २० फुटी उंचीसह काळाचौकीच्या 'दि वेस्टर्न इंडिया मिल्स चाळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'च्या मंडपात अवतरला आहे. बाप्पाचे हे मनमोहक रूप पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी पहिल्या दिवसापासूनच होऊ लागली आहे. हे गणेशोत्सव मंडळ यंदा आपले ५५वे वर्ष साजरे करीत आहे. वासुदेवरूपी बाप्पाची विशाल मूर्ती घडवली आहे प्रसिद्ध मूर्तिकार अरुण दत्ते यांनी.

छायाचित्र - अनिल पानस्कर


# युक्रेन-रशिया युद्धात भारत करणार मध्यस्थी; अजित डोवाल रशियाला जाणार

## ब्रिक्सच्या बैठकीत शांतता प्रस्तावावर चर्चेचे संकेत

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

युक्रेन-रशिया युद्धात भारताने मध्यस्थी करावी, असे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी नुकतेच म्हटले होते. पुतीन यांच्यानंतर इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही युक्रेन युद्ध संपवण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, असे म्हटले आहे. दरम्यान, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (NSA) अजित डोवाल पुढील आठवड्यात रशियाला जाणार आहेत. ऑक्टोबरमध्ये कझान येथे होणाऱ्या शिखर परिषदेपूर्वी ब्रिक्स एनएसए बैठकीत ते सहभागी होतील. यादरम्यान डोवाल रशिया-युक्रेन संघर्ष सोडवण्यासाठी चर्चा करू शकतात, अशी माहिती मिळत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यासोबत झालेल्या फोन संभाषणात चर्चा झाली होती की, त्यांच्या भेटीनंतर पंतप्रधान शांततेशी संबंधित चर्चा करण्यासाठी त्यांचे एनएसए रशियाला पाठवतील. मिळालेल्या माहितीनुसार, या दौऱ्यात डोवाल आपल्या रशियन समकक्ष आणि ब्रिक्सच्या इतर सदस्य देशांच्या प्रतिनिधींना भेटतील. यामध्ये जुलैमध्ये मॉस्को शिखर परिषदेत झालेल्या चर्चेच्या आधारे पुढील रणनीती ठरवता येईल. सौदी अरेबिया, यूएई, इराण, इजिप्त आणि इथिओपिया हे नवीन



पाच सदस्य देश या गटात सामील झाल्यानंतर प्रथमच ही ब्रिक्स एनएसए बैठक होत आहे.

### रशिया -युक्रेन युद्धात भारत मध्यस्थी करू शकतो, म्हणाले होते पुतीन

*रशिया आणि युक्रेनमध्ये फेब्रुवारी २०२२ पासून युद्ध सुरू आहे. अनेक देशांनी युद्ध थांबवण्याचे आवाहन केले आहे. दोन दिवसांपूर्वी व्लादिमीर पुतिन यांनीही या प्रदेशात सुरू असलेल्या संकटावर तोडगा काढण्यासाठी भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, अशी कबुली दिली होती. इस्तंबूल चर्चेदरम्यान ज्या करारांवर सहमती झाली आणि ज्यांची अंमलबजावणी होऊ शकली नाही ते भविष्यातील शांतता चर्चेचा आधार बनू शकतात यावर पुतिन यांनी भर दिला. पुतिन यांनी युक्रेन संघर्षावर भारत, चीन आणि ब्राझील मध्यस्थी करू शकताता असे म्हणाले.*

# पाकव्याप्त काश्मीरच्या नागरिकांना आम्ही आमचे मानतो!

## पीओकेवासियांना भारतात सामील होण्याचे आवाहन

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

जम्मू आणि काश्मीरमध्ये अनेक वर्षांनंतर विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. निवडणुकीच्या प्रचारासाठी आज केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये राहणाऱ्या नागरिकांना भारतात सामील होण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, "आम्ही तुम्हाला आमचे समजतो, पण पाकिस्तान तुम्हाला विदेशी नागरिक समजतो." आपला मुद्दा स्पष्ट करताना राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानच्या अतिरिक्त महाअधिवक्ताने दाखल केलेल्या एका प्रतिज्ञापत्राचा हवाला दिला. ज्यामध्ये पाकव्याप्त काश्मीर हा विदेशी भाग असल्याचे नमूद केले आहे.



पंबन विधानसभेतील भाजपाचे उमेदवार राकेश सिंह ठाकूर यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या जाहीर सभेत बोलताना म्हणाले की, २०१९ साली अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने आमूलाग्र बदल झाले आहेत. जम्मू-काश्मीर खोऱ्यातील मुलांच्या हातात आता पिस्तूल आणि बंदूकाऐवजी लॅपटॉप आणि संगणक आला आहे. यामुळे आता श्रीनगरच्या जनतेवर कुणीही गोळी झाडण्याची हिंमत करत नाही. तुम्ही जम्मू-काश्मीरमध्ये भाजपाचे सरकार स्थापन करण्यात पुढाकार घ्या, आम्ही याठिकाणी अभूतपूर्व असा विकास करून दाखवू. इथे होणारा विकास पाहून बाजूच्या पाकव्याप्त काश्मीरमधील लोक म्हणतील की, आम्हाला पाकिस्तानबरोबर राहायचे नाही, आम्हीही भारतात सामील होऊ", असेही राजनाथ सिंह म्हणाले.

पंबन विधानसभेत भाजपाचे उमेदवार ठाकूर यांचा सामना नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार अर्जून सिंह राजू यांच्याशी होणार आहे. तर अपक्ष उमेदवार सुरज सिंह परिहार हेदेखील दोघांना टक्कर देणार आहेत.

# विकासकामे करूनही बारामतीत हरलो - अजित पवार

**बारामती**

बारामतीमध्ये अनेक विकासकामे केली तरी आपला पराभव झाला. बारामतीकरांना मी सोडून वेगळा आमदार मिळाला पाहिजे का असा सवाल करत अजित पवारांनी आपली नाराजी बोलून दाखवली. आपण केलेला कामांची आणि नव्या आमदाराच्या कामाची तुलना करा असा, आव्हान सुद्धा अजित पवार यांनी बारामतीमधील एका कार्यक्रमात केलं.

बारामतीकरांना मी सोडून कोणीतरी दुसरा आमदार मिळाला पाहिजे. मग त्यानंतर १९९१ ते २०२४ च्या कामाची तुलना



त्या आमदाराशी करा. आपण विकासकामे न सांगता मागणी न करता केली जात आहेत. आता बारामती शहरसोडून साडेसातशे कोटी रुपयांची काम चालू आहेत. मेडिकल कॉलेज चालू आहे. जनतेच्या मागणीवरून आम्ही आहिल्याबाई होळकर असं महाविद्यालयाचं नाव दिलं.

## महत्त्वाचे

### बक्सरमध्ये 13 डब्यांसह निघाले इंजिन, 9 मागेच

**धारोली :** पाटणाकडे जाणाऱ्या मगध एक्स्प्रेसला रविवारी दुपारी रघुनाथपूर ते तुडीगंजदरम्यान अपघात झाला. ट्रेनचे कपलिंग तुटल्याने ट्रेनचे दोन भाग झाले. मात्र, कोणाचेही नुकसान झाले नाही. या घटनेनंतर प्रवाशांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.हावडा दिल्ली रेल्वे मार्गावरील धारौली हॉटजवळ हा अपघात झाला. कपलिंग तुटल्यानंतर जोराचा धक्का बसून ट्रेन थांबली. ट्रेन थांबताच सर्व प्रवासी कसेतरी ट्रेनमधून उतरले. कोणीतरी आपत्कालीन खिडकीतून उडी मारली तर कोणी गेटमधून ढकलले.सकाळी 11.07च्या सुमारास हा अपघात झाला. 13 डबे इंजिनसह पुढे गेले, तर 9 मागे राहिले. सुमारे 70 मीटरनंतर ट्रेन थांबली. या घटनेनंतर या रेल्वे विभागाचे कामकाज ठप्प झाले आहे.अपघातानंतर रेल्वे प्रशासनात घबराट पसरली आहे. रेल्वे सुरक्षा दलाचे प्रभारी निरीक्षक दीपक कुमार यांनी सांगितले की, घटनेची माहिती मिळताच रेल्वे संरक्षण दलाचे एक पथक घटनास्थळी पाठवण्यात आले.

### अभिनेत्री दीपिकाला कन्यारत्न

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग आई-वडील झाले आहेत. दीपिकाने एका मुलीला जन्म दिला आहे. अभिनेत्रीला शनिवारी दुपारी मुंबईतील गोरेगाव परिसरातील एचएन रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्यासोबत रणवीर सिंग आणि तिचे कुटुंबीयही उपस्थित होते. याआधी 6 सप्टेंबरला दीपिका बाप्पाच्या दर्शनासाठी सिद्धिविनायक मंदिरात पोहोचली होती.दीपिकाने या वर्षी 28 फेब्रुवारीला सोशल मीडियावर तिच्या प्रेग्नेंसीची घोषणा केली होती. तिने एक पोस्ट शेअर करत लिहिले की ती सप्टेंबर 2024 मध्ये बाळाला जन्म देणार आहे.

# बजरंग काँग्रेस सोड, नाहीतर जीवाला मुकशील!

## पुनियाला धमकी, पोलिसांनी दाखल केला एफआयआर

**वृत्तसंस्था**
**सोनिपत**

भारताचा स्टार कुस्तीपटू आणि नुकताच काँग्रेसमध्ये सामील झालेल्या बजरंग पुनियाला जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. कुस्तीपटूने सांगितले की, त्याला विदेशी नंबरवरून ही धमकी मिळाली होती. त्यात लिहिले आहे की, 'बजरंग काँग्रेस सोड अन्यथा तुझी आणि तुझ्या कुटुंबाची खैर नाही. हा आमचा शेवटचा मेसेज आहे. निवडणुकीपूर्वी आम्ही काय आहोत ते दाखवून देऊ. तुला कुठेही तक्रार करायची असेल करं, हा आमचा पहिला आणि शेवटचा इशारा आहे.' यानंतर बजरंगच्या तक्रारीवरून पोलिसांनी एफआयआर दाखल करून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.



याप्रकरणी पोलिस प्रवक्ते रवींद्र सिंह म्हणाले, बजरंग पुनियाने सोनीपतमधील बहलगड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्याला बाहेरच्या नंबरवरून मेसेज आला आहे. त्याच्या तक्रारीवरून पोलिसांची कारवाई सुरू आहे. अज्ञात व्यक्तीने धमकी दिली आहे. हा तपासाचा विषय आहे. त्याचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आणि त्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे. याशिवाय धमकी देणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जात आहेत.

# सीबीआयची मुंबईत मोठी कामगिरी; लाचखोर जिएसटी अधीक्षकासह दोघांना बेड्या

**प्रतिनिधी**
**मुंबई**

केंद्रीय अन्वेषण विभागाने मुंबईमध्ये मोठी कारवाई केली आहे. सीबीआयने मुंबईमध्ये सीजीएसटीच्या लाचखोर अधीक्षकासह आणखी दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत. ६० लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. सीबीआयच्या या मोठ्या कारवाईने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, केंद्रीय अन्वेषण विभागाच्या टीमने मुंबईमध्ये मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत सीबीआयने सीजीएसटी (अँटी इव्हेशन) अधीक्षकासह 3 आरोपींना आणि दोन खाजगी व्यक्तींना 60 लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी अटक केली आहे. ६० लाखांपैकी २० लाखांची लाच घेतानाच रंगेहात पकडण्यात आले असून याप्रकरणात तब्बल सात अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सीजीएसटीकडे असलेल्या एका प्रकरणात कारवाई न करण्यासाठी तक्रारदाराकडून या अधिकाऱ्यांनी तब्बल ६० लाखांची मागणी केल्याचे तपासात समोर आले आहे. यामधील ३० लाख रुपये हवालामार्फत देण्यात आल्याचे सीबीआयने म्हटले आहे. या कारवाईमध्ये सीजीएसटीचे अतिरिक्त सह आयुक्त, सीजीएसटी आयुक्त, 4 अधीक्षक, 2 सनदी लेखापालासह एका खासगी व्यक्तींचा सहभाग आहे. दरम्यान, या सर्वांना सीबीआयच्या विशेष न्यायालयाने 10 सप्टेंबरपर्यंत कोठडी सुनावली आहे.

# ममता बॅनर्जींना मोठा धक्का
# खा. जवाहर सरकार यांचा राजीनामा

**वृत्तसंस्था**
**कोलकाता**

कोलकाता येथील आर.जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. या घटनेनंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आलेलं आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीबीआय करत आहे. या घटनेनंतर पश्चिम बंगाल सरकारच्या विरोधात अनेक संघटनांनी आंदोलन केलं होतं. यानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावरही विरोधकांनी टीकेची झोड उठवली.

आता तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार जवाहर सरकार यांनी कोलकाता येथील आर.जी. कर वैद्यकीय रुग्णालयात महिला डॉक्टरांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. याबाबत त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांना पत्र लिहून पद सोडण्याचा निर्णय घेतला असल्याचं म्हटलं आहे.

# धारावी पुनर्विकास प्रकल्पाला गती देण्यासाठी मिठागराच्या जमिनी सुपूर्द

## ही जमीन परवडणाऱ्या घरांसाठी बीएमसी डीपी (BMC DP) २०३४ अंतर्गत आरक्षित

**प्रतिनिधी**
**मुंबई**

सोमवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने मुंबईतील २५६ एकर मिठागरे जमीन हस्तांतरित करण्यास मंजुरी दिल्याने धारावी पुनर्विकास प्रकल्पाला मोठी गती मिळाली असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती मिळणार आहे. ज्यांचे भाडेपट्टे संपले आहेत आणि परवडणारी घरे बांधण्यासाठी वापरता येतील अशा निकामी मिठागरांच्या जागेची निश्चिती केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने या जमिनीच्या हस्तांतरणासाठी केंद्राशी संपर्क साधून पुढील कार्यवाहीसाठी प्रक्रिया राबविली.

धारावी पुनर्विकास प्रकल्प हा राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक आहे ज्यामध्ये प्रथमच अपात्र म्हणून वर्गीकृत असलेल्यांनाही घर दिले जाणार आहे. राज्य सरकारच्या सूत्रांनी सांगितले की, केंद्र सरकार मिठागरांच्या जमिनी महाराष्ट्र सरकारला ९९ वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देणार आहे. तसेच ही जमीन बीएमसीच्या विकास आराखड्यात (डीपी) २०२४ मध्ये परवडणारी घरे बांधण्यासाठी बाजूला ठेवली गेली आहे आणि यासाठी २०१८ मध्ये मान्यता मिळाली होती.

एकत्रित शिवसेना तेव्हा बीएमसीची सत्ता सांभाळत होती. त्यावेळी राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार होते. मिठागराच्या जमिनीवर बांधकाम



केल्याने पावसाळ्यात पूर येईल आणि स्थलांतरित पक्ष्यांचा अधिवास नष्ट होईल या आरोपांबाबत, धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण देखील दिले आहे. यातील स्पष्टीकरणानुसार "या जमिनी किनारा नियमन क्षेत्रात (कोस्टल रेग्युलेशन झोन) येत नाहीत.


गेल्या अनेक वर्षांपासून या जमिनींवर मीठ तयार करण्याचा कोणताही उपक्रम सुरू नाही. तसेच, या जमिनीचा काही भाग अंधेरी पश्चिम येथील लोखंडवाला कॉम्प्लेक्स ते विक्रोळी पूर्व दरम्यानच्या मेट्रो लाईन ६ च्या कारशेडसाठी.एमएमआरडीएला आधीच देण्यात आला आहे आणि एमएमआरडीएने जमिनीवर प्राथमिक कामही सुरू केले आहे.

याशिवाय वडाळा येथील मिठागरांच्या जागांवर केंद्र सरकारच्या कस्टम विभागाने आधीच कार्यालये आणि कर्मचारी निवासस्थाने बांधली आहेत, असेही स्पष्ट करण्यात आले. डीआरपीच्या आणखी एका अधिकाऱ्याने सांगितले की, धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी मागितलेल्या मिठागरांचा एक भाग, सीप्झ आणि मेट्रो लाइन 3 साठी कारशेड उभारण्यासाठी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारनेच निश्चित केला होता. तसेच ही जमीन किनारा नियमन क्षेत्र (कोस्टल रेग्युलेशन झोन) निर्बंधांतर्गत येत नाही; त्यामुळे स्थलांतरित पक्ष्यांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम होण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचेही पुनवर्सन प्रकल्प प्राधिकरणाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# मुंबईतील दरड प्रवण भागात संरक्षण भिंत बांधणे, रहिवाशांचे पुनर्वसन व स्थलांतराची जबाबदारी पालिकेकडे

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबईतील अनेक भागात असलेल्या डोंगरावरलोक वर्षानुवर्षे राहत आहेत. दर पावसाळ्यात तिथे दरडी कोसळून जीवित वा वित्त हानी होत असते. हा डोंगराचा भाग जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित येत असल्याने न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे तिथे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संरक्षण भिंत बांधली जात आहे. तर पालिका केवळ पावसाळ्यापूर्वी धोकादायक ठिकाणी राहत असलेल्या लोकांना स्थलांतर करण्याची नोटीस बजावत असते. पण आता जिल्हाधिकारी कार्यालयाची जबाबदारी आता मुंबई महानगर पालिकेवर ढकलण्यात आली आहे. त्यामुळे पालिका आता पहील्या टप्प्यात संरक्षण भिंत बांधणे व काहीचे पुनर्वसन व स्थलांतर करण्यासाठी ११५ कोटी रुपये खर्च करणार आहे. खरे तर



ही सरकारची जबाबदारी असताना सरकारमधील मंत्री हा खर्च करायला पालिकेला भाग पाडत आहे.

भांडुप, विक्रोळी, घाटकोपर, चेंबूर, कुर्ला पूर्व, साकीनाका, जोगेश्वरी, मालाड या मुंबई उपनगरातील २९१ ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका कायम आहे. याठिकाणी २२ हजारांहून अधिक लोक वास्तव्य करत आहेत. रहिवाशांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंत बांधण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. संरक्षक भिंत बांधण्यासह रहिवाशांचे पुनर्वसन व स्थलांतर करण्यात येणार आहे. यासाठी ११५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे असे पालिकेकडूनच सांगण्यात आले आहे.

मुंबईत २९१ ठिकाणी दरडींचा धोका असून त्यातील २०० हून अधिक ठिकाणे ही कुर्ला ते मुलुंड पश्चिम पर्यंतच्या भागात आहेत. विक्रोळी, भांडूपपर्यंत १३२, घाटकोपरमध्ये ३२ ठिकाणे धोकादायक आहेत. कुर्ला येथे १८ ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका आहे. मुलुंड येथील ५ ठिकाणे, देवनार परीसरात ११, मालाडमध्ये १८ आणि मलबार हिल, ताडदेव परिसरात १६ अशी हो धोकादायक ठिकाणे आहेत.

जिल्हाधिकारी आणि पालिकेने ही ठिकाणे निश्चित केली आहेत ही ठिकाणे आता संरक्षित केली जाणार आहेत. आवश्यक असेलत्या झोपडीधारकांचे स्थलांतर करण्यात येणार आहे. आवश्यक तेथे संरक्षक भिती बांधाल्या जाणार आहेत. मात्र हे काम पावसाळ्यानंतर लगेच सुरू होणार असल्याची माहिती मुंबईचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. मुंबईतील २९१ ठिकाणे ही डोंगराळ भागातील धोकादायक म्हणून जाहीर करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी अजूनही २२,४८३ झोपड्यांपैकी ९.६५७ झोपड्यांना इतरत्र स्थलांतरित करण्याची शिफारस मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने यापूर्वी राज्य सरकारकडे केली आहे. त्यांचे पूनर्वसनही टप्याटप्याने पालिकेकडून केले जाणार आहे.

## चारोटी महामार्गाची दुरवस्था!

**जव्हार :** जव्हार -कासा - चारोटी राज्यमार्गासह विक्रमगड- तलवाडा तसेच विक्रमगड- मनोर या रस्त्यांची दुरावस्था झाली असून अपघाताची संख्या वाढली आहे. या रस्त्यांना सर्वत्र खड्डे पडले असून हे खड्डे राज्य महामार्ग विभागाने व बांधकाम विभागाने अद्याप बुजवलेले नसल्यामुळे गणपतीचे आगमन खड्डेमय रस्त्यावरून होणार आहे. विशेष म्हणजे जव्हार- कासा-चारोटी रस्त्याला तलवाड्याच्या पुढे मोठ-मोठे खड्डे पडले असून त्यामध्ये पावसाचे पाणी साचल्यामुळे खड्डा दिसत नसल्याने अनेक कार व मोटारसायकलचे अपघात होत आहेत, तर कमरे एवढ्या खड्ड्यांमुळे जीवित हानी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. खड्डा मोठा असल्यामुळे खड्ड्यात आपटून अनेक वाहनांचे नुकसान होत आहे. असे असताना राज्य महामार्ग विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे. जव्हार- तलवाडा- कासा रस्ता, व विक्रमगड- तलवाडा रस्ता तसेच विक्रमगड-मनोर रस्ता हे रस्ते अतिशय खराब झाले असून तातडीने याकडे लक्ष देऊन खड्डे बुजवले गेले नाही तर जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे, त्यामुळे हे खड्डे तातडीने बुजवावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



## थोडक्यात

### निवृत्त महिला बँक अधिकाऱ्याला 28 लाखांचा गंडा

**वसई:** डिजिटल अरेस्टच्या नावाखाली फसवणूक करण्याची आणखी एक घटना वसईमध्ये उघडकीस आली आहे. बँकेतून निवृत्त झालेल्या एका वृध्द महिलेला सायबर भामट्यांनी तब्बल २८ लाखांचा गंडा घातला आहे. एकाच आठवड्यातील ही दुसरी घटना आहे. फिर्यादी महिला ७६ वर्षांच्या असून त्या मुंबईच्या वांद्रे येथील पाली हिल परिसरात रहातात. त्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया मधून व्यवस्थापक पदावरून निवृत्त झाल्या आहेत. त्यांचे पती आजारी असल्याने त्या वसईतील एका नामांकित आश्रमात सध्या पतीच्या उपचारासाठी रहातात.२३ जुलै रोजी त्यांना एका सायबर भामट्याचा फोन आला. मी रिझर्व बँक ऑफ इंडिया मधून बोलत असून तुमच्या नावाने घेतलेल्या क्रेडिट कार्डचा गैरवापर झाला असल्याचे त्याने सांगितले. तसेच तुमच्यावर हैदराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याचे सांगितले. या नंतर फिर्यादी यांना हैद्राबाद पोलिसांच्या नावाने व्हिडिओ कॉल आला आणि फिर्यादी यांना 'डिजिटल अरेस्ट' करत असल्याचे सांगितले. तुमच्या सर्व बँक खात्यांवर नजर असून असल्याचे सांगून दिवसभर त्यांना व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून कॅमेऱ्यासमोर 'अटक' करून ठेवली. यातून मार्ग काढण्यासाठी पैशांची मागणी केली. फिर्यादी सायबर भामट्यांच्या जाळ्यात अडकल्या. त्या चार वेळा वांद्रे येथील आपल्या बँकेत गेल्या आणि २८ लाख रुपये या सायबर भामट्यांना पाठवले. हा सगळा प्रकार अवघ्या पंधरा दिवसांच्या कालावधीत घडला. यानंतर भामट्यांनी फिर्यादी महिलेचे शेअर सर्टिफिकेट ट्रान्सफर करण्यासाठी सांगितले. त्यानंतर मात्र फिर्यादी यांना संशय आला आणि आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी वसई पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

### तिकीट तपासनीसाच्या सतर्कतेमुळे प्रवाशाला जीवदान

**मुंबई:** धावत्या रेल्वेगाडीतून उतरताना किंवा रेल्वेगाडी पकडताना प्रवाशांचा तोल जाऊन, जीव जाण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र, मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील तिकीट तपासनीसाने अतुलनीय शौर्य दाखविल्याने एका महिलेचे प्राण वाचविले. या कामगिरीसाठी मुंबई विभागाचे वरिष्ठ तिकीट तपासनीस रामावतार मीना यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. नुकताच गाडी क्रमांक ११०२९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-कोल्हापूर कोयना एक्स्प्रेस पुणे स्थानकात आली असता एक महिला अनवधानाने घसरली. ती चालत्या रेल्वेगाडी खाली जाण्याची शक्यता होती. मात्र, कर्तव्यावरील तिकीट तपासनीस मीना यांनी तिला पडताना पाहिले. त्यांनी त्यांच्याकडील बॅग फेकून दिली आणि महिलेला सुरक्षितपणे खेचले. दरम्यान, लाखो प्रवाशांचा सुरळीत आणि सुरक्षित प्रवास सुनिश्चित करण्यासाठी रेल्वे कर्मचारी सतर्क आहेत. तसेच रेल्वे प्रवाशांनी धावत्या रेल्वेगाडीत चढणे किंवा उतरणे टाळण्याचे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाकडून केले आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# वसई-विरारमध्ये 13,426 गणेशमूर्त्यांचे विसर्जन

प्रतिनिधी
■ वसई

वसई- विरारमध्ये दिड दिवसासाठी प्रतिष्ठापना झालेल्या गणरायांच्या आगमनाचा मोठा जल्लोष साजरा झाला. रविवारी दिड दिवसीय बाप्पांना वाजतगाजत निरोप देण्यात आला. एकूण 13,426 गणरायांना वाजत गाजत भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. यात 110 सार्वजनिक तर 13316 खाजगी गणरायांचा समावेश होता.

**दिड दिवसीय बाप्पांना वाजतगाजत निरोप**



वसई- विरार शहर महानगरपालिकेने विविध ठिकाणच्या 105 गणेश घाटांवर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पालिकेकडून कृत्रिम तलावांची निर्मिती ठिकठिकाणी करण्यात आली होती. तर विसर्जन मिरवणुकीत कोठेही वाहतुकीचा बोजवारा उडू नये यासाठी मोठा पोलीस फौजफाटा तैनात ठेवण्यात आला होता. पालिकेचे कर्मचारीही विसर्जन घाटावर सज्ज होते. विसर्जन घाटावर पालिकेकडून निर्माल्य साठवण्यासाठी व्यवस्था करण्यात आली होती. तसेच मिरवणुकीदरम्यान, पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने कोठेही अनुचित प्रकार घडला नाही. रविवारी वाजत गाजत गणरायांना गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या अशा जयघोषात भावपूर्ण निरोप देण्यात आला. दिड दिवसांच्या बाप्पांच्या विसर्जनानंतर तालुक्यात अडीच, पाच, सहा, सात व अकरा दिवसांच्या बाप्पांचा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा होत आहे.

# वादग्रस्त अधिकाऱ्यांना पालिकेकडून बढती!

**वसई- विरारकरांत संताप**

प्रतिनिधी
■ वसई

वसई -विरार शहर महानगरपालिकेने उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत पालिकेतील जेष्ठ लिपिकांना सेवाजेष्ठतेनुसार बढती दिली आहे. मात्र पालिकेने वादग्रस्त आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना पालिकेत पदनिर्देशित अधिकाऱ्यांना संधी दिल्याने या अधिकाऱ्यांवरील पालिकेचे प्रेम खऱ्या अर्थाने कसे ऊतू चालले आहे ते दिसून आले आहे. पालिका प्रशासनाच्या या फाजील लाडामुळे वसई- विरारकरांनी मात्र संताप व्यक्त केला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने सेवाजेष्ठतेचे दाखले देत वसई -विरार महानगरपालिकेचा आकृतीबंध दि.9 सप्टेंबर 2024 च्या शासन निर्णयानुसार मंजूर केलेला आहे. त्यास अनुसरून अधिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवा जेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2027 तसेच, दि. 07/05/2021 रोजीच्या शासन निर्णय प्रकरणी उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सहाय्यक आयुक्त/उपलेखापरिक्षक/लेखाअधिकारी/उपनगरसचिव या पदावर मानीव दिनांकासह पदोन्नती देण्यास पदोन्नती समितीच्या दि.12/02/2024 च्या बैठकित शिफारस केलेली आहे. प्रशासकीय ठराव क्र. 3117, दि. 14/02/2024 अन्वये सदर शिफारस मंजूर करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेने एकूण 20 अधिकाऱ्यांना पदोन्नती दिली आहे.

मात्र या सेवाजेष्ठतेनुसार वरीष्ठ अधिकाऱ्यांना बढती देताना पालिकेने या सर्व अधिकाऱ्यांची पार्श्वभूमी तपासून का पाहिली नाही, असा संभ्रम वसई- विरारकरांत निर्माण झाला आहे. यात गिल्सन घोन्सालवीस, निता कोरे, मोहन संख्ये, शशिकांत पाटील, संजय पाटील, अजय चौकेकर, मनोज वनमाळी, रविंद्र पाटील, राजेश घरत या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात अनधिकृत बांधकामांचा मोठ्या प्रमाणात स्फोट झाला आहे. अनधिकृत बांधकामांवर थातुरमातूर कारवाया करून एकप्रकारे भूमाफियांना खतपाणी घालण्याचे आरोप या अधिकाऱ्यांवर अनेकदा झालेले आहेत.

यातील मोहन संख्ये हे नाव तर सर्वात वादग्रस्त आहे. त्यांच्यावर यंदा राज्याच्या पावसाळी अधिवेशनात कथित वाणिज्य घोटाळ्याबाबत आरोप करण्यात आला. त्यांच्यावरील कारवाईचे पान प्रलंबित असताना त्यांना प्रभाग समिती 'ड' विभागाच्या (आचोळे विभागाच्या) सहाय्यक आयुक्तपदी बढती देण्यात आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तसेच इतर वादग्रस्त अधिकाऱ्यांसमोरही मानाचे पान वाढण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. यात आस्थापना विभागाचे प्र.सहा.आयुक्त रविंद्र पाटील यांच्यावर तर पालिकेचे प्रेम मोठ्या प्रमाणात ऊतू गेले आहे. वर्षानुवर्ष त्यांच्या हातात असलेली आस्थापना विभागाची प्रभारी जबाबदारी आता थेट सहाय्यक आयुक्त पदापर्यंतच्या बाढतीत बदलल्याने नागरिकांत नाराजीचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# आशिष शेलार यांना उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार मिळाल्याबद्दल मेघाश्रेयतर्फे त्यांचा झाला सन्मान



प्रतिनिधी
■ मुंबई

भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपती मुर्मू यांच्या हस्ते उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार मिळाल्याबद्दल मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार ॲडव्होकेट आशिष शेलार यांचा शहरातील प्रतिष्ठित सामाजिक संस्था मेघाश्रेयतर्फे खार जिमखाना येथे आयोजित एका भव्य कार्यक्रमात त्यांचा गौरव करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा सीमा सिंह यांचे पती एमके सिंह राहुल कनाल यांनी गणेशाची मूर्ती आणि संविधान पुस्तक देऊन सन्मान केला.

यावेळी त्यांच्यासोबत सीमा सिंह याही उपस्थित होत्या. या पुरस्कारामुळे संपूर्ण वांद्रे पश्चिम विधानसभेचा अभिमान आणि आदर वाढल्याचे सीमा सिंह यांनी सांगितले. शेलारजींनी जनतेसाठी केलेल्या समर्पित कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. आशिष शेलार म्हणाले की, पुरस्कार मिळाल्यानंतर आपली जबाबदारी आणखी वाढली आहे. ते विकासकामे जलद गतीने पूर्ण करतील. मेघाश्रेयाने दिलेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना, अशा सन्मानामुळे प्रेरणा मिळते. सीमा सिंग यांचे कौतुक करताना शेलार म्हणाले की, महिलांच्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगावरील उपचारासाठी त्या करत असलेल्या कार्याचे कौतुक करावे तितके कमीच आहे. या मार्गात जिथे जिथे त्यांना माझी गरज भासेल तिथे मी सदैव भावासारखा उभा राहीन.

# विक्रोळीत गणेशोत्सवातून मोबाईल व्यसनमुक्तीचे आवाहन

**दर्शना गोवेकर-गायकवाड यांनी साकारला देखावा**

प्रतिनिधी
■ मुंबई

मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे मानवी जीवन बदलले आहे. मोबाईलच्या स्क्रीनमध्ये माणूस इतका मग्न होतो की आपल्या आजूबाजूला काय घडत आहे, याचे भान राहत नाही. म्हणूनच मोबाईलचा अतिरेक टाळण्यासाठी घरगुती गणेशोत्सवाच्या सजावटीतून विक्रोळीतील दर्शना गोवेकर-गायकवाड यांनी संदेशात्मक देखावा साकारला आहे. मोबाईलच्या अति वापरापासून लोकांची सुटका होऊ दे, सामाजिक भान असलेला समाज घडू दे, असे साकडे गणरायाला घालण्यात आले आहे.

देखावा तयार करण्यासाठी त्यांना पंधरा दिवसांचा कालावधी लागला. की पॅड चे मोबाईल असताना आणि स्मार्टफोन आल्यानंतर बदललेले मानवी जीवन यावर संदेश आणि देखावा साकारण्यात आला. सजावटीसाठी पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर केला आहे. स्मार्टफोनमध्ये आपण कसे गुरफटून गेलो आहोत हे या सजावटीतून दाखवण्यात आले आहे.

दर्शना यांनी सांगितले की, "आजकाल सगळेच मोबाईलवर इतके व्यस्त असतात की कुटुंब,



मित्र किंवा आपल्या आजूबाजूच्या लोकांचा विसर पडतो. मोबाईलच्या व्यसनामुळे आपले आरोग्यही बिघडत आहे. म्हणूनच मी या गणेशोत्सवाच्या निमित्ताने लोकांचे लक्ष याकडे वेधले आहे. ही सजावट तयार करण्यासाठी मला नताशा, निकिता पांगे, सिद्धेश शिंदे, अनिरुद्ध साळवे, जय चव्हाण, गणेश आंगणे यांनी मदत केली.

या निमित्ताने, दर्शना यांनी आवाहन केले आहे की, आपण सगळे मिळून मोबाईलच्या या व्यसनावर मात करण्याचा प्रयत्न करूया. आपण आपल्या जीवनात मोबाईलचा आवश्यकतेनुसार वापर करून आपले आरोग्य चांगले ठेवू शकतो आणि आपल्या कुटुंबासोबत अधिक वेळ घालवू शकतो.

सदर देखाव्यात आजी आजोबा आणि नातवंडे खेळताना दाखवण्यात आले आहेत. पूर्वीची जीवन पद्धती आणि आत्ताच जीवन याबाबत संदेश देण्यात आला आहे. जेवताना बसायला पूर्वी आणि आत्ता असणारा फरक यावर भाष्य करण्यात आले आहे.

# ऐन गणशोत्सवाच्या धामधुमीत एक मुन्नाभाईवर कारवाई

**पालिकेच्या धाड मोहिमेत बोगस डॉक्टरचे पित्तळ उघडे**

■ वसई

सध्या वसई- विरार शहरात गणेशोत्सवाची धामधुम सुरू असताना नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन बोगस वैद्यकीय प्रमाणपत्र धारण करून उपचार करणाऱ्या एका मुन्नाभाईवर कारवाई करण्यात आली आहे. वसई -विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत अनधिकृत चाळींची बांधकामं वाढली आहेत. बोगस बांधकामांचा आलेख वाढला आहे. या बोगस बांधकामांत, बकाल वस्त्यांत परप्रांतातील अनेक अशिक्षित नागरिक राहायला आले आहेत. या नागरिकांच्या अज्ञानाचा फायदा घेत काही मुन्नाभाई बोगस वैद्यकीय प्रमाणपत्र धारण करून त्यांच्यावर बेकायदेशीरपणे उपचार करून त्यांच्या जीवाला धोका उत्पन्न करू लागले आहेत. अशा पार्श्वभूमीवर वसई -विरार शहर महानगरपालिकेने बोगस डॉक्टरांवर कारवाईची धाड मोहीम सुरु केली आहे.

पालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून देण्यात आलेल्या




माहितीनुसार, वसई पूर्वतील बालाजी क्लिनिक गाळा नं.2 सागर मंथन इंडस्ट्रीयल समोर राजावली रोड, भोयदापाडा येथील दवाखान्यात डॉ. आरविंद कुमार आर. यादव यांचे नावे फलक लावून रामचंद्र रामदुर यादव हा बोगस क्लिनिक चालवत असल्याचे दिसून आले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याच्याकडे कोणतीही वैद्य डिग्री नसल्याचे आढळुन आले. तसेच त्याच्याकडे इयत्ता बारावी (विज्ञान), सहा. परिचारक याचे शिक्षण घेतले असल्याचे समजले. त्याचप्रमाणे दवाखान्यात इन्जेक्शन्स, आय.व्हि.सेट व इतर ॲलोपॅथी औषधे आढळून आली. या क्लिनिकमधील डॉ. अरविंद कुमार आर. यादव हजर नसताना रामचंद्र रामदुर यादव हा एका रुग्णास औषधोपचार करुन त्यास इंजेक्शन देत असताना आढळून आला. याप्रकरणी रामचंद्र रामदुर यादव याच्यावर वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पालिकेकडुन एकाच बोगस डॉक्टवर कारवाई करण्यात आल्यानंतर वसई -विरारमध्ये इतर ठिकाणी आणखी बोगस डॉक्टर कार्यरत असण्याची शक्यता असून त्यांच्यावरदेखील अशा स्वरूपाची कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# बदलापुरातील घटनेनंतर पोलिसांचे पत्रकारांशी केलेले वर्तन BUJ ने केला पोलिसांच्या या मनमानीचा निषेध

प्रतिनिधी
■ मुंबई

बदलापूर येथील अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटनेला जबाबदार असणारे पोलीस प्रशासन आणि वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांशी अर्वाच्य भाषेत बोलणारे व धमकी देणारे माजी महापौर वामन म्हात्रे यांचा बृहन्मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्ट (BUJ) जाहीर निषेध केला आहे.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर या शहरात 12 ऑगस्ट रोजी नर्सरीच्या दोन विद्यार्थिनींवर कथित विनयभंग झाला. ही बातमी प्रकाशित झाली आणि एकच खळबळ उडाली. पोलिसांनी प्रथम माहिती अहवाल (FIR) नोंदविण्यास टाळाटाळ केली पण नंतर FIR नोंदवून लैंगिक शोषणाचा आरोप असणाऱ्या आरोपीला अटक केली. त्यानंतर बदलापुरातील सजग जनतेने रस्त्यावर उतरून या घटनेचा तीव्र निषेध केला. विविध माध्यमांनी ही बातमी लावून धरली. अनेक पत्रकार बदलापूर मध्ये माहिती घेत होते. खूप मोठ्या प्रमाणात मीडिया कव्हरेज होत होते. त्यामुळे बदलापूरचे माजी महापौर वामन म्हात्रे संतप्त झाले होते. सकाळच्या पत्रकार मोहिनी जाधव यांच्याशी बोलताना वामन म्हात्रे यांनी खूप खालच्या पातळीवर जाऊन त्यांच्यावर घाणेरडे आरोप केले. पत्रकार मोहिनी जाधव या बदलापूर पोलीस स्टेशनला रीतसर तक्रार करण्यासाठी गेल्या असता त्यांना तक्रार करण्यापासून परावृत्त करण्यासाठी पोलिसांनी दबाव टाकला पण मोहिनी जाधव या आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. शेवटी पोलिसांनी नाविलाजास्तव FIR दाखल केला परंतु वामन म्हात्रे यांचा अटकपूर्व जामीन कोर्टाने नामंजूर करूनही त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

असे असताना आता बदलापूर प्रकरणात वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना दोषी ठरवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मोहीम बदलापूर पोलिसांनी सुरू केली आहे. श्रद्धा ठोंबरे या महिला पत्रकारावर लोकांच्या भावना भडकावल्याचा गुन्हा दाखल करून त्यांना पोलीस ठाण्यात हजर राहण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. रेल्वे पोलिसांनी सुद्धा पत्रकारांना टार्गेट करायला सुरुवात केली आहे. वामन म्हात्रे यांचा अटकपूर्व जामीन कल्याण न्यायालयाने दोनदा तर मुंबई उच्च न्यायालयाने एकदा फेटाळूनही वामन म्हात्रे यांना पोलीस अटक करत नाही आहेत. ज्या शाळेत मुलींवर अत्याचार झाला त्या शाळेच्या व्यवस्थापनाला पोलीस पाठीशी घालत आहेत परंतु वार्तांकनाचं काम करणाऱ्या पत्रकारावर गुन्हे दाखल करून त्रास देण्याचं काम चालू आहे. बदलापुरातील पोलिसांचे एकूण वर्तन बघता त्यांची ही कृती संताप जनक आणि निषेधार्य आहे.

बृहन्मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्ट (BUJ) मागणी करीत आहे की, कर्तव्यावर असणाऱ्या पत्रकारांना पूर्णपणे कायद्याचे संरक्षण प्राप्त व्हावे. त्यांना काम करताना राजकीय शक्ती किंवा पोलीस यापासून संरक्षण मिळावे. पत्रकारांना त्रास देण्याचे पोलिस प्रशासनाने ताबतोब थांबवावे. तसेच मुंबई उच्च न्यायालयाने वामन म्हात्रे यांचा अटकपूर्व जामीन नामंजूर केलेला आहे त्यामुळे वामन म्हात्रे यांना ताबडतोब अटक करण्यात यावी. अशी मागणी बी यू जे चे सचिव इंद्रकुमार जैन यांनी केली आहे. व स्वतंत्र पत्रकार आणि युट्युबर्स विरुद्ध पोलिसांची धमकावणारी कारवाई त्वरित थांबली पाहिजे. असे त्यांनी म्हटले आहे.

# वेश्यालयांच्या त्रासामुळे नागरिकांचे स्थलांतर

**मंत्र्यांची व्हिजिट ठरतेय सोशल मीडियाकरता परवणी, कारवाई शून्य**

प्रतिनिधी
■ मुंबई

दक्षिण मुंबईतील ऑपेरा हाऊस परिसर हा गिरगाव चौपाटी, , रॉक्सी सिनेमा, पंचरत्न डायमंड मार्केट, हिंदुजा कॉलेज, त्रिभुवन दास ज्वेलर्स, सुखसागर पाव भाजी सेंटर आणि शंभर वर्षे जुन्या अशा ऑपेरा हाऊस थिएटरमुळे खूपच प्रसिद्ध आहे . या सूप्रसिद्ध वास्तू पाहण्यासाठी आणि त्यांचा उपभोग घेण्यासाठी वर्षाकाठी लाखोलोक या ऑपेरा हाऊसला भेट देत असतात . परंतु ह्या परिसराचे अस्तित्व सध्या ऑपेरा हाउस इथल्या कॉंग्रेस हाऊस मध्ये मुजऱ्याच्या नावाखाली चालत असणाऱ्या



वेश्याव्यवसाय अड्ड्यांमुळे खूपच बदनाम झाले आहे.

दिवस रात्र वेश्या व्यवसाय चालत असल्यामुळे परप्रांतीय मंडळी येथे सुख भोगायला येतात.गिऱ्हाईकाला सिगरेट दारू पान तंबाखू या वस्तू देखील पुरवल्या जातात. इतकाच काय तर एमडी ड्रग्स देखील मिळत असल्याची चर्चा जोरदार सुरू आहे. कुंटणखण्यांमध्ये रंगीबेरंगी लाईट , मोठ्या आवाजात गाणी लावून मुजाऱ्याच्या नावाखाली अक्षरशः नंगा नाच केला जातो. ह्या दिखव्याला भुलून शौकीन मंडळी अमाप पैसा उडवून जातात. दारू पिऊन कोणी धिंगाणा केलाच तर त्या दलाल चांगलाच चोप देतात. या बद्दल अनेक तक्रारी डी बी मार्ग पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

कॉंग्रेस हाऊस एसीवीपी रोडवर अनेक रहिवासी इमारती, खाजगी कार्यालय आहेत. ह्याच गल्लीत २ इंग्लिश मीडियम शाळा तर २ जुनी पुरातन देवळ असल्यामुळे दिवसभर रहदारी सुरू असते. ग्रँट रोड स्थानकाला जाण्यासाठी रेल्वे प्रवासी ह्याच मार्गाचा वापर करत असल्याने येथे नेमीच गर्दी दिसते येथून भ्रमण करताना नागरिकांना दलालांच्या बोलण्याचा मात्र नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच कुंटनखाण्यात येणारी मंडळी अनेक वेळा दारू पिऊन धिंगाणा घालतात. तर कधी रस्त्यामध्येच लघु शका करत उभे असतात.

**मंत्र्यांच्या भेटीनंतरही कारवाई शून्य**

*मलबारहिलचे आमदार व पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी स्थानिकांनचे गाऱ्हाणे एकून उपयुक्त परिमंडळ २ यांना कारवाईचे आदेश दिले होते. पण मात्र दोनच दिवसात कॉंग्रेस हाउस येथील कुंटणखाना पुन्हा चालू झाले.त्यामुळे मंत्री महोदयांच्या विजीट म्हणजे सोशल मीडिया वाल्यांना फोटोसेशन व रिल्स बनवण्याचे साधन बनले असून मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोलीस दोघेही मंत्री महोदयांच्या आदेशाला जुमानत नसल्यामुळे मंत्री महोदयांची व्हिजिट म्हणजे सोशल मीडिया वाल्यांनसाठी फक्त परवणी ठरत असून कारवाई मात्र शून्य होत असल्याचे दिसून येत आहेत.*

एस एस ब्रांच ने चार ते पाच वेळा पिटा केस दाखल केल्या आहेत. माझी उपयुक्त कृष्ण पकाश यांनी रेड मारली होती त्यावेळेस येथील कुंटनखाणे तब्बल १५ दिवस बंद होता. त्यानंतर कॉंग्रेस हाउस पुन्हा जोमाने सुरू झाले आणि स्थानिकांना पुन्हा वेश्यालयांचा त्रास सुरू झाला. एकाच कुंटण खाण्यांमध्ये दोन दोन तीन पोटमाळे बांधून बेकायदेशीर रूम तयार केले आहेत ह्या सर्व गोष्टीला मनपा डी विभगचे अधिकारी सुधा खतपाणी घालत आहेत.मुंबई पोलिसांना कॉंग्रेस हाऊसवर अनेक काळ धाडी मारून स्वतःचे रेकॉर्ड स्वतःच मोडले आहेत परंतु येथील वेश्याव्यवसाय बंद करण्यास त्यांना आजपर्यंत जमलेले नाही त्यामुळे मुंबई पोलीस कोणाच्यातरी दबावाला बळी पडत असल्याचे बोलले जात आहे.

**जाहीर नोटीस**

सुचना ध्यावी की, आमचे अशील श्री श्यामबली मौलु प्रजापती व श्रीमती मुन्नीदेवी एस. प्रजापती यांनी रूम क्र. बी/०४. साई राज निवास चाळ नं.२ महादेव नगर, अल्कापुरी, अचोले रोड, नालासोपारा पूर्व, ता. वसई, जिल्हा पालघर-४०१२०९ एक्षेत्र ३०० बी. फीट, सर्वे नं. १०९ (न्यु)चे मालक आहे. ते रुम बिल्डर्स श्री सतीश सिंह आणि श्री लक्ष्मण मारू दरम्यान प्रथम दस्ता ऐवजाया नोटरी स्तावेज मूळ करार (Agreement for sale) हरविला/गहाळ गेला आहे. तरी त्यासदसंदर्भात कुठल्याही व्यक्तिीची, संस्थेवी हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत सर्व त्या लेखी कागदीपत्री पुराव्यांसहीत शॉप नं. ११ गुरु गोविन्दसिंग नगर, गाला नगर, नालासोपारा पू. ता. वसई जि. पालघर- ४०१२०९ ह्या पत्त्यावर कळवावे.

**ॲड. नीलस्तन राय**
**वकील**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 80
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ८०
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

## दिड दिवसाच्या गणपतींना भक्तांचा निरोप

**मुंबई :** काल दिड दिवसाच्या गणपती बाप्पांचे विसर्जन मोठ्या भक्तिभावाने झाले. संध्याकाळी ६ वाजेपर्यंत ६९४१ गणपतींचे नैसर्गिक तलावांमध्ये तर ३१६२ गणेश मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्ये झाले.नैसर्गिक तलावांमध्ये संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सार्वजनिक ३७, घरगुती ६८९४ , हरतालिका १० तर कृत्रिम तलावात सार्वजनिक २२, घरगुती ३१३४, हरतालिका ६ चे विसर्जन करण्यात आले.



# अमित शहा 'लालबागचा राजा'ही गुजरातला नेतील - संजय राऊत

## शरद पवारांच्या डोक्यात काय चालले हे 100 जन्म फडणवीसांना कळणार नाही

प्रतिनिधी
■ मुंबई

शरद पवार यांच्या डोक्यात काय चालले आहे, हे फडणवीस यांना कळाले असते तर त्यांची आजच्या सारखी अवस्था झाली नसती. शरद पवार यांच्या डोक्यात काय सुरू आहे हे तुम्हाला शंभर जन्म कळणार नाही. कोणाचे नाव आहे, कोणाचे नाही. 2019 साली सुद्धा पवार साहेबांच्या डोक्यात काय होते हे फडणवीसांना कळले नव्हते. पण, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, असा टोला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला आहे.



संजय राऊत म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुंबई दौऱ्यावर येत आहेत. याबाबत ठाकरे गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी शहांवर निशाणा साधला. त्यांचे मुंबईत काय काम आहे, मुंबई लुटण्यासाठीच ते येत आहेत. मणिपूरला जाऊन तेथील हिंसाचार रोखण्याची त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी मुबईत येण्याऐवजी मणिपूरला जाऊन परिस्थिती हाताळावी, असे आव्हानही ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अमित शहा यांना दिले आहे.

संजय राऊत म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. याचे महत्त्व कमी करण्याचा डाव आखण्यात येत आहे. महाराष्ट्रात दळभद्री राजकारण करत महाराष्ट्र कमजोर करण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे आमचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना विरोध असल्याचे संजय राऊत यांनी सांगितले. मुंबई आणि महाराष्ट्रातील अनेक उद्योगधंदे, महत्त्वाच्या संस्था, आर्थिक केंद्रे गुजरातला पळवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे अमित शहा यांच्याबाबत महाराष्ट्राच्या भावना तीव्र आहेत, असे ते म्हणाले.

संजय राऊत म्हणाले की,विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांना मुंबई आणि महापालिका त्यांना कमजोर करायची आहे. त्यामुळेच ते महापालिका, विधानसभा निवडणुका घेण्यात येत नाही. त्यांनी मुंबई, पुणे, नागपूर महापालिका लुटण्यासाठी त्यांच्या लोकांना दिली आहे. मुंबई लुटून त्यांचे दलाल त्यांना पैसे देत असल्याचा आरोपही त्यांनी केला. प्रत्येक महापालिका लुटण्याचा त्यांचा मोठा घोटाळा आहे. त्यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी निवडणुका घ्याव्या, असे आव्हानही त्यांनी दिले.



*मुंबई : राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्र दौऱ्यात दादर चैत्यभूमी स्मारक येथे भेट देवून 'भारतरत्न 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. रामदासआठवले, भिमराव आंबेडकर, नागसेन कांबळे, डॉ. राहुल बोधी महाथेरो आदी उपस्थित होते.*

# तुमच्यातील अहंकारच तुमचा वैचारिक ऱ्हास करेल...

## भाजपा नेते आ. प्रविण दरेकरांचे जरांगेंना प्रत्युत्तर

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठा समाजाने पाठबळ देऊन तुमच्यातील अंगार फुलवण्याचा प्रयत्न केला. मात्र तुमच्यात एवढा अहंकार आलाय कि तोच तुमचा वैचारिक ऱ्हास केल्याशिवाय राहणार नाही, असे सणसणीत प्रत्युत्तर भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिले आहे.

दरेकर म्हणाले कि, मी भंगार आहे कि अंगार आहे हे महाराष्ट्रातील मराठा समाजाला नीट माहित आहे. परंतु जरांगे तुमच्यात अहंकार आलाय. तुमच्यावर कुणी प्रश्न विचारायचे नाही, प्रतिक्रिया द्यायची नाही. दिल्या कि तुम्ही शिव्या देणार. हे मराठा समाजाला अजिबात आवडत नाही. तुम्ही खुशमस्कऱ्यांच्या धुंदीत आहात. त्यामुळे तुम्हाला ते दिसणार नाही. मराठा समाजाने पाठबळ देऊन तुमच्यातील अंगार फुलवण्याचा प्रयत्न केला. मात्र तुमच्यात एवढा



अहंकार आलाय कि तोच तुमचा वैचारिक ऱ्हास केल्याशिवाय राहणार नाही.

दरेकर पुढे म्हणाले कि, आम्ही गरीब मराठ्यांच्या मुलांसाठी जे काय करतोय याची जरांगेंना कल्पना नाही. त्याच्या एक टक्के मराठा समाजाच्या मुलांसाठी तुम्ही काय केले असेल तर सांगा. केवळ भावनिक बोलायचे आणि मराठा समाजाला गुमराह करायचे हे काम जरांगेंचे सुरू आहे.

ना कधी रचनात्मक काम केलेत आणि कधी करू शकत केवळ वल्गना करायच्या, सरकारवर कुणाची तरी सुपारी घेऊन बोलायचे यापलीकडे जरांगेंनी मराठा समाजाला काय दिले याचा लेखाजोगा मांडा अन्यथा माझी तयारी आहे आपण काय केले आणि मी काय केले हे लोकांसमोर येईल, असे आव्हानच दरेकरांनी जरांगे पाटील यांना दिले.

# श्री गणेश विसर्जनस्थळे महानगरपालिकेच्या सोयी सुविधांनी सज्ज

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सवाला शनिवारी जल्लोषात सुरुवात झाली. मुंबईतील श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून यंदाही अधिकाधिक विविध सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ रोजी अनंत चतुर्दशी दिनी होणा-या श्री गणेशमूर्ती विसर्जनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विशेष तयारी करण्यात आली आहे. विसर्जन सुलभ, निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी पालिकेने जय्यत तयारी केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी, ७१ नियंत्रण कक्ष तसेच अन्य विविध सोयीसुविधांसह सुसज्ज आहेत. यंदा गणेश मूर्ती विसर्जनासाठी ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम



विसर्जनस्थळांवर व्यवस्था आहे, अशी माहिती उप आयुक्त (परिमंडळ २) तथा गणेशोत्सव समन्वयक प्रशांत सपकाळे यांनी दिली आहे. श्रीगणेशोत्सव अंतर्गत स्वराज्य भूमी (गिरगांव चौपाटी) येथे पालिकेच्या डी विभागामार्फत भाविकांसाठी विविध नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

उप आयुक्त प्रशांत सपकाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईतील घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी मागील दोन महिन्यांपासून पूर्वतयारी सुरू आहे. श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी येणारे वाहन चौपाटीवरील वाळूमध्ये अडकू नयेत व श्री मूर्तींचे विसर्जन सुरळीतपणे पार पडावे, याकरीता चौपाटीच्या किना-यांवर ४७८ स्टील प्लेट तसेच छोट्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी विविध ठिकाणी ४३ जर्मन तराफ्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. चौपाट्यांवर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ७६१ जीवरक्षकांसह ४८ मोटरबोटी तैनात केल्या आहेत. विसर्जनापूर्वी भाविकांनी अर्पण केलेले हार, फुले इत्यादी निर्माल्य जमा करण्यासाठी १६३ निर्माल्य कलशांसह २७४ निर्माल्य वाहनांचीही सोय करण्यात आली आहे.

प्रशासकीय विभागांच्या स्तरावर १९२ नियंत्रण कक्ष. तर सुरक्षेच्या दृष्टीने ६६ निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत. विविध ठिकाणी ७२ स्वागत कक्ष तयार करण्यात आले आहेत.आरोग्य विभागाकडून ७५ प्रथमोपचार केंद्रांसह ६७ रुग्णवाहिका देखील सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. प्रभावी प्रकाश योजनेसाठी 'बेस्ट' च्या सहकार्याने खांबांवर व उंच जागी सुमारे १,०९७ फ्लडलाईट आणि २७ सर्चलाईट लावले आहेत. विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी १२७ फिरती प्रसाधनगृहं सज्ज ठेवण्यात आली आहेत. त्याचबरोबर आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे अग्निशमन दलाच्या सुसज्ज वाहनासहीत प्रशिक्षित मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहेत.

### *'क्यूआर कोड'वरही मिळणार कृत्रिम तलावांची माहिती*

*याशिवाय 'क्यू आर कोड'द्वारे देखील भाविकांना, गणेश भक्तांना कृत्रिम तलावांची माहिती मिळणार आहे. हा 'क्यू आर कोड' स्कॅन केल्यावर मुंबईतील कृत्रिम तलावांची माहिती आणि गुगल मॅप लिंक भाविकांना उपलब्ध होणार आहे. यामुळे मुंबईतील यंदाचा गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक होण्यासाठी मदत होणार आहे.*

# पालिकेच्या नायर रुग्णालयात गैरसोयी औषधांचा तुटवडा, जेवणाचा दर्जा निकृष्ट

## दक्षिण मुंबई जिल्हा काँग्रेसची आयुक्तांकडे तक्रार

प्रतिनिधी
■ मुंबई

रुग्णालयात येणा-या आय.पी.डी., ओ.पी. डी. मध्ये देण्यात येत असलेल्या औषधांचा तुटवडा जाणवतो आहे. त्यामुळे रुग्णांना देण्यात येणा-या उपचारांमध्ये शिथिलता येते. तसेच दाखल असलेल्या रुग्णांना देण्यात येणारे जेवण निकृष्ट दर्जाचे असून रुग्णांकडून व नातेवाईकांकडून तक्रारी येत असतात.

या आणि अशा तक्रारींचे निवेदन दक्षिण मुंबई जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष रवी बावकर यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांना दिले आहे. व या संबंधी चौकशी करून कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

रुग्णालयात जे कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर नियुक्त आहेत. त्यांना बायोमेट्रीक हजेरी लावावी लागते . परंतू जे डॉक्टर्स कंत्राटी पध्दतीवर नियुक्त आहेत. त्यांना हजेरी लावावी लागत नाही. मनपाच्या सेवेत रुजू असलेल्या कायमस्वरुपी डॉक्टरांना क्लार्कची कामे दिली जातात. त्यामुळे त्यांचे मनोबलावर परिणाम होत आहे. त्यासाठी नियमित डॉक्टरांना त्यांच्या दर्जाची कामे कायमस्वरुपी देण्यात यावी., रुग्णालयातील एक्सप्रेस सिटीस्कॅन मशीन वारंवार बंद असतात. त्यामुळे रुग्णांना बाहेरील खाजगी सेंटरमधून उपचार चाचण्या जास्त दराने करुन घ्यावा लागतात. आदी तक्रारीही बावकर यांनी नमूद केल्या आहेत.

या तक्रारींचा सखोल विचार करुन त्यावर तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व रुग्णांना नियमित व दर्जेदार सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. अशी मागणीही रवी बावकर यांनी शेवटी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

# परप्रांतियांना शेतजमीन खरेदीस मनाई करण्याची जनता दलाची मागणी

## बनावट शेतकरी दाखल्यांच्या आधारे खरेदी?

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्यप्रदेश व राजस्थानमधील शेतकरी दाखले वापरून राज्यात विशेषतः कोकणात परप्रांतीयांकडून मोठ्या प्रमाणावर शेतजमीन खरेदी होत असल्याचा आरोप जनता दल (से) पक्ष व कोकण जनविकास समितीने केला असून, उत्तराखंड प्रमाणे राज्यात परप्रांतियांना शेतजमीन खरेदी करण्यास मनाई करावी, अशी मागणी केली आहे.

स्थानिक जनतेच्या गरिबीचा फायदा घेऊन, मोठ्या प्रमाणावर राज्यातील आणि राज्याबाहेरील व्यक्ती कोकणात शेत जमिनीची खरेदी करीत आहेत. मूळचे राजस्थानमधील असलेल्या बलराम जाखड व उत्तर प्रदेश मधील कृपाशंकर सिंग यांच्यासारख्या अनेकांनी कोकणात जमिनी विकत घेतल्या आहेत. नाणार परिसरातही अनेक गुजराती व्यक्तींनी जमिनी विकत घेतल्याचे यापूर्वीच उघड झाले आहे. अलीकडे राजापूर तालुक्यात पुण्यातील एका परप्रांतीय व्यक्तीने तब्बल दोनशे एकर जागा खरेदी केल्याची चर्चा आहे. अख्खा गाव विकत घेण्याचे कांदाटी खोऱ्यातील प्रकरणही असेच आहे.

राज्यात शेतजमीन खरेदी करण्यासाठी खरेदीदार व्यक्तीकडे शेतकरी दाखला असणे गरजेचे असते. परंतु ज्याच्याकडे असा दाखला नसतो, त्यांना राजस्थान - मध्यप्रदेश या राज्यात संबंधित व्यक्तीच्या नावे जमीन खरेदी करून त्या आधारे दलाल शेतकरी दाखला मिळवून देतात. या दाखल्याच्या आधारे राज्यात विशेष करून कोकणात परप्रांतीय व्यक्ती जमीन खरेदी करीत आहेत, असे जनता दलाचे प्रदेश अध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे, मुंबई अध्यक्ष प्रभाकर नारकर तसेच कोकण जनविकास समितीचे जगदिश नलावडे, सुरेश रासम, संजय परब, केतन कदम, प्रशांत गायकवाड यांनी म्हटले आहे.

जमीन खरेदीसाठी राजस्थान वा मध्यप्रदेशमध्ये न जाताच घरबसल्या अवघ्या ३५ ते ४५ हजार रुपयांत तेथील शेतकरी असल्याचा दाखला दलाल मिळवून देतात. ही प्रक्रिया २० दिवस ते दीड महिन्यात पार पाडली जाते. त्यामुळे मुळातच हे दाखले बनावट असण्याची शक्यता आहे. हे दाखले खरे आहेत, असे गृहित धरले तरी संबंधित व्यक्ती राजस्थान वा मध्य प्रदेशमध्ये शेत जमिनीची मालक होऊ शकेल, पण तेथे न जाताच व सदर जमीन न कसताच शेतकरी कशी बनू शकेल, असा सवाल या सर्वांनी राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिलेल्या निवेदनात केला आहे.

जानेवारी २०२४ मध्ये उत्तराखंड सरकारने राज्यातील शेत जमिनीची राज्याबाहेरील व्यक्तींनी खरेदी करण्यास बंदी आणली आहे. तसेच अकृषिक (एनए) जमीन खरेदीसाठीही २५० चौरस मीटर जागेची मर्यादा घातली आहे. याच आधारे राज्यात आणि विशेष करून कोकणात परप्रांतीयांना शेतजमीन खरेदी करण्यास मनाई करावी. याबाबत काही तांत्रिक व कायदेशीर अडचणी येणार असतील तर परराज्यात जमीन खरेदी करून शेतकरी दाखला मिळविल्यानंतर, संबंधित जागेवर प्रत्यक्ष शेती केल्याचे पुरावे मागण्यात यावेत वा किमान तीन ते पाच वर्षात महाराष्ट्रात जमीन खरेदी करण्यास प्रतिबंध करण्यात यावा, असे या सर्वांनी म्हटले आहे.

उद्योग-हॉटेल यासाठी कोणी अकृषिक जमीन खरेदी करणार असेल तर त्यासाठी क्षेत्र मर्यादा ठरवून देण्यात यावी व त्या व्यवसायासाठी सदर जमिनीचा तीन वर्षात वापर न करण्यात आल्यास सदर जमीन सरकारने ताब्यात घेण्याची तरतूद करावी, अशी मागणीही महसूल मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. गेल्या दहा वर्षात बाहेरील राज्यातील शेतकरी दाखल्याच्या आधारे राज्यात व कोकणात शेतजमीन खरेदीचे जे व्यवहार झाले आहेत, ते तपासण्याचे आदेश देऊन, बनावट दाखल्यांच्या आधारे झालेले व्यवहार रद्द करावेत, असेही या निवेदनात म्हटले आहे.

# शासनाचे राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार'प्राप्त शिक्षकांचा पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडून सत्कार



प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्य शासनाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अध्यापन करणाऱ्या सहा शिक्षकांना 'क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. या सर्व शिक्षकांचा बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून सत्कार करण्यात आला. आदर्शवत कामगिरी करुन महानगरपालिकेच्या सर्व शाळांसमोर आदर्श उभे करणाऱ्या या सर्व शिक्षकांचा अभिमान असल्याचे गौरवोद्गार काढत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे कौतूक केले. महानगरपालिका मुख्यालयात पार पडलेल्या या सत्कार सोहळ्यात अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, सह आयुक्त (महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय) . चंद्रशेखर चोरे, उप आयुक्त (शिक्षण) चंदा जाधव, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजू तडवी आदींनीही सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र राज्य शासनाकडून सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील विविध विभागातील निवडक शिक्षकांचा 'क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला.

# वांद्रे येथे 52 फुटी कन्याकुमारी स्वामी विवेकानंद स्मारक मंदिरात विराजमान झाले गणराय

प्रतिनिधी
■ मुंबई

दरवर्षी प्रसिध्द मंदिरांची हुबेहुब आरास साकारणाऱ्या वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे यावर्षी कन्याकुमारी येथील प्रसिध्द स्वामी विवेकानंद स्मारकाची ५२ फुट उंच हुबेहुब प्रतिकृती साकारली आहे. यात गणराय विराजमान झाले आहेत.मंडळाने यावेळी हैद्राबाद येथून आणण्यात आलेल्या दिव्याची रोषणाई तरुणाईचे आकर्षण ठरत आहे.

मुंबई भाजपाचे अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार हे प्रमुख सल्लागार असलेल्या वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यावर्षीचे 28 वे वर्ष असून दरवर्षी एक प्रसिध्द मंदिराची आरास या मंडळातर्फे केली जाते. गतवर्षी उज्जेन येथील महाकाल मंदिर तर त्यापुर्वी केदारनाथ मंदिर, पशुपतीनाथसह महाराष्ट्रातील विठ्ठल मंदिर, शिर्डिचे साई समाधी मंदिर अशी विविध मंदिरांची प्रतिकृती साकारण्यात आली होती. तर मंडळाच्या



रौप्यमहोत्सवी वर्षात लोकामान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या रत्नागिरीतील वाड्याची प्रतिकृती साकारण्यात आली होती.

विविध जाती धर्मियांची वस्ती असलेल्या रेक्लमेशन येथे हा गणेशोत्सव साजरा होत असून या उत्सवात सर्वधर्मिय सहभागी होतात आणि मोठया उत्साहात हा उत्सव साजरा करतात हेही त्याचे वैशिष्ट. तसेच दरवर्षी चित्रपट, क्रिडा, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर या बाप्पाच्या दर्शनासाठी आवर्जुन येतात त्यामुळे मुंबईतील गणेशोत्सव मंडळामध्ये हे मंडळ लक्षवेधी ठरले आहे.

विवकानंद स्मारक हे वावातुराई, कन्याकुमारी येथील पवित्र स्थान आणि प्रसिद्ध पर्यटन क्षेत्र आहे . हे स्मारक भारताच्या दक्षिण टोकापासून ५०० मीटर अंतरावर समुद्रातील दोन खडकांवर आहे. विवेकानंद स्मारक समितीने इ.स. १९७० स्वामी विवेकानंद यांच्या सन्मानार्थ हे स्मारक बांधले. स्वामी विवेकानंद डिसेंबर १८९२ मध्ये याच खडकांवर ध्यानास बसले होते. तर लोकसभा निवडणुकी नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही याच मंदिरात ध्यानधारणा केली होती.

त्याच मंदिराची हुबेहुब प्रतिकृती वांद्रे येथे साकारण्यात आली आहे. यासोबतच या संपुर्ण परिसरात हैद्राबाद येथून आणण्यात आलेल्या दिव्यांची खास रोषणाई करण्यात आली असून तरुणांसाठी ही रोषणाई खास आकर्षण ठरणार आहे. दरवर्षी मंदिर आणि ही रोषणाई पाहण्यासाठी मोठी गर्दी होते तसेच याही वर्षीची आरास गणेशभक्तांना नक्की आवडेल असा विश्वास मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र राऊत यांनी व्यक्त केला आहे.

# 'प्रधानमंत्री मातृ वंदना' योजनेचा दोन वर्षांत आठ लाखांपेक्षा अधिक मातांनी घेतला लाभ!

■ मुंबई

गर्भवती माता व त्यांच्या नवजात बालकांचे तसेच स्तनदा मातेचे आरोग्य सुधारावे व त्यांना सकस पोषण आहार घेण्यास प्रोत्साहित करून त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी, या हेतूने प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत जानेवारी २०२२ ते ऑगस्ट २०२४ दरम्यान राज्यातील ८,३७,३९९ गर्भवती महिला व मतांनी लाभ घेतला आहे.

भारतात दारिद्र्य रेषेखालील तसेच दारिद्र्य रेषेवरील अनेक गर्भवती महिलांना गरोदरपणाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत मजुरीसाठी काम करावे लागते तसेच प्रसुतीनंतरही शारीरिक क्षमता नसताना मजुरीचे काम करावे लागते. परिणामी अशा गर्भवती माता कुपोषित राहून त्यांचे तसेच नवजात बाळ कुपोषित वा कमी वजनाचे जन्माला येते. यातून आरोग्याच्या समस्या निर्माण होऊन माता व बालमृत्यूचे प्रमाण वाढते हे लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने २०१७ पासून संपूर्ण देशात प्रधानमंत्री मातृवंदना योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर बुडीत मजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला असून यामुळे गर्भवती महिला व मातांना सकस आहार घेण्यास प्रोत्साहन तसेच पुरेशी विश्रांती मिळू शकते. यातून माता व नवजात बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत असून या योजनेत केंद्राचा सहभाग ६० टक्के तर राज्यांचा वाटा ४० टक्के असे निश्चित करण्यात आले आहे.

अधिसूचना



पेंशन अदालत २०२४

पेंशन अदालत १६/१२/२०२४ (सोमवार) रोजी पश्चिम रेल्वे मुख्यालय, चर्चगेट, विभागीय कार्यालये व कार्यशाळांमध्ये आयोजित केली जाईल. पश्चिम रेल्वेतून निवृत्त झालेले कर्मचारी आणि सेटलमेंट देय न भरल्याबद्दल तक्रारी आहेत, ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत त्या कार्यालय / युनिटच्या संबंधित कार्मिक अधिकाऱ्याला आपले निवेदन ( तिप्पट स्वरूपात) तपशीलवार पाठवू शकतात. म्हणजे मुख्यालयासाठी प्रधान मुख्य कार्मिक अधिकारी (PCPO), विभागांसाठी वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी (Sr.DPO)आणि कार्यशाळांसाठी मुख्य कारखाना प्रबंधक (C.W.M). निवेदनांमध्ये नाव, पद, श्रेणी, नियुक्तीची तारीख, निवृतीची तारीख आणि पेंशन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) क्रमांक इत्यादी आणि तक्रारीचे स्वरूप सूचित केले पाहिजे. संबंधित कागदपत्रांच्या प्रती देखील प्रतिनिधित्वासह संलग्न केल्या जाऊ शकतात. प्रतिनिधीत्व सादर करण्याची शेवटची तारीख ३१/१०/२०२४ आहे. मुख्यालय चर्चगेट मधून निवृत्त झालेले निवृत्तीवेतनधारक त्यांची तक्रार इमेल आयडी : apobna@gmail.com वर पाठवू शकतात.

**मुख्यालयाचे ठिकाणः पश्चिम रेल्वे मुख्यालय कार्यालय, विमर्श कक्ष (बोर्ड रूम) पहिला मजला, जुनी इमारत, चर्चगेट, मुंबई – ४०००२०.**

**NB:** एक्स ग्रेसिया अनुदान, लिव रोख रक्कम, PF, GIS, वैद्यकीय बिले, MACP, अनुकंपा आधारावरील नियुक्ती, वेतन निश्चिती, वेतनाची थकबाकी, पदोन्नती संबंधित समस्या, कायदेशीर प्रकरणे आणि पॉलिसी विषयक समस्या या पेंशन अदालत अंतर्गत येत नाही.

पश्चिम रेल्वे
wr.indianrailways.gov.in
0518

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : X.com/WesternRly

दुःखाचे ज्ञान होणे ही
दुःखावर मात करण्याची पहिली
महत्त्वाची पायरी असते.



- गौतम बुद्ध

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, ९ सप्टेंबर २०२४

# राज्य नेतृत्वाची माळ कुणाच्या गळ्यात?

**देशात** लोकसभा निवडणूक होऊन काही महिनेच झाले आहेत. तोच आता राज्यात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीला आपकी बार ४०० होऊ दिले नाही. महाविकास आघाडीने महायुतीचा अति उतावळेपणा रोखून धरला. त्यामुळे सहाजिकच महाविकास आघाडीमध्ये आगामी होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणूकसाठी उत्साहाचे वातावरण आहे. महाराष्ट्रातील महायुतीची सत्ता घालून शकू असा विश्वास महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीचे कार्यकर्ते झाडून कामाला लागलेले दिसतात. सरकारची एकही चूक जनतेसमोर न आणण्याची चूक हे कार्यकर्ते करताना दिसत नाहीत. त्यासाठी महाविकास आघाडीचे घटक पक्ष कार्यकर्त्यांना बळ देताना दिसत आहेत. लोकसभेच्या आधी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये जे एका प्रकारचे नैराश्य, भय दिसत होते ते आता कमी झालेले दिसत आहे. काँग्रेस मधील महाराष्ट्राचे नेतृत्व जोमाने कामाला लागले आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या पक्षातील नेतृत्व सुद्धा नव्या उत्साहात कार्यकर्त्यांच्या भेटीघाठी घेत आहेत. उद्धव ठाकरे यांची शिवसेना सुद्धा यासाठी पुढे आहे. तर दुसरीकडे महायुती देखील कंबर कसून कामाला लागली आहे. महाविकास आघाडीचे प्रत्येक आरोप महायुतीकडून खंबीरपणे खोडून काढले जात आहेत. भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी असे तीनही पक्षाचे नेते एका दिलाने कामाला लागले आहेत. महाराष्ट्रातील या पक्षाचे नेते सुद्धा तळागाळात जाऊ लागले आहेत, कार्यकर्त्यांच्या भेटी येऊ लागले आहेत. सध्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अद्याप जाहीर झालेली नसली तरी झाडून सगळे जण जणू निवडणुकीच्या प्रचाराच्या रणधुमाळे उतरले आहेत, असे चित्र राज्यात निर्माण झाले आहे. ती नोव्हेंबर महिन्यात होऊ शकते अशी अटकळ आहे. तीन पक्षांचा एक गट अशी दोन गटांमध्ये चुरस आहे. कोणत्या गटाची म्हणजे आघाडीची अथवा युतीची सरशी होणार यावर चर्चा कमी, तर मुख्यमंत्री कोण होणार यावर चर्चेचा भर अधिक आहे. याची सुरुवात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने केली. त्याला आता काही दिवसांचा पॉज घेऊन अगोदर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने उत्तर दिले. पवारांच्या उत्तराचीच री काँग्रेसने ओढली आहे. ती त्या पक्षाच्या प्रकृतीला साजेशी अशीच आहे. चेहर्यावर आता चर्चा नको, निवडणूक झाल्यावर ते बघू, असा स्पष्ट संदेश आहे व तो उद्धव ठाकरेंना दिला गेला. त्यानंतर ठाकरे गटाचा सूरही काहीसा मवाळ झाला आहे. तरीही राज्याचे नेतृत्व कोण करणार, हा प्रश्न कायम आहेच. तो केवळ महाविकास आघाडीपुरता नाही, तर महायुतीच्या पहिल्यांदाच अशी वेगळी लढत होते आहे. त्यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी परस्परांना आव्हान देत आहेत. लोकसभेलाही लढत झाली होती. पण त्यावेळी दिल्लीचे कारभारी निवडायचे होते. आता निवड राज्यातील कारभाऱ्यांची आहे. या चार पक्षांखेरीज भारतीय जनता पार्टी आणि काँग्रेस हे पारंपरिक प्रतिस्पर्धी आहेतच, शिवाय लहानसहान पक्षांचीही तिसऱ्या आघाडीची जुळवाजुळव सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आपल्याला किंवा आपल्या आघाडीला किती जागा मिळतात आणि आपण किती जागा जिंकू ते नंतर पाहता येईल. अगोदर जिंकलो तर मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवर कोण बसणार याचा चेंडू रिंगणात टाकण्यात आला. ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी त्यांच्या रोजच्या वार्तालापात खूप पूर्वीच या विषयाला तोंड फोडले. मध्यंतरी उद्धव ठाकरे यांचा दिल्ली दौराही झाला. उद्धव स्वतः त्यांच्या सेनेचे श्रेष्ठी असल्यामुळे त्यांनी दिल्लीला जाण्याचे काही कारण नव्हते. तरीही ते दिल्लीला गेले, काँग्रेसच्या हायकमांडला भेटले. मुख्यमंत्रिपदासाठी पुन्हा ठाकरे यांचाच चेहरा पुढे करण्याच्या संदर्भात ही चाचपणी होती. किंबहुना ठाकरे गटाकडून तशी मागणी किंवा संकेतच दिल्लीत काँग्रेस हायकमांडला दिले गेले, असेही म्हटले जाते. राजकीय चर्चा, त्याही भविष्यातील घडामोडींच्या संदर्भात असल्या की त्या क्वचित बाहेर समजतात. जे समजते तेही अर्धसत्य असते. उद्धव यांनी जरी त्यांची इच्छा अथवा आकांक्षा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष व्यक्त केली असली, तरी काँग्रेस अशा उतावळेपणावर विश्वास ठेवत नाही. त्यांना स्वतःला स्पष्ट बहुमत मिळाले असले, तरी काँग्रेस त्यांच्या प्रक्रियेनुसार दोन निरीक्षक राज्यात पाठवून, सर्व विजयी आमदारांशी चर्चा करून आणि सर्वाधिकार सोनिया गांधी अथवा राहुल गांधी यांच्याकडे सोपवण्याचा ठराव संमत करून आपले सोपस्कार पार पडत असते. आताही त्यापेक्षा वेगळे काही होणार नाही. उलट यावेळी काँग्रेससोबत दोन आणखी तुल्यबळ पक्ष सत्तेत वाटेकरी असणार आहेत. त्यामुळे काँग्रेस सर्व असलेले नसलेले पर्याय तपासूनच कोणत्या एका बाबीला हिरवा कंदील देईल. आताच्या महायुतीच्या सरकारच्या अगोदर महाआघाडीचेच सरकार होते अन् ते कोणत्याही कुरबुरीविना चालले असे म्हणता येऊ शकते. मात्र, महाविकास आघाडी स्थापन झाली त्यावेळेची आणि आताची परिस्थिती वेगळी आहे. तेव्हा उद्धव यांची शिवसेना दुभंगली नव्हती. काँग्रेस गेल्या दहा वर्षांपासून केंद्र आणि राज्य या दोन्ही ठिकाणाहून सत्तेच्या बाहेर गेल्यामुळे शक्तीहीन झाली होती. अनेक दिग्गज भासणार्या नेत्यांनीही काँग्रेसची साथ सोडली होती. राष्ट्रवादी काँग्रेस एकसंध आणि आपले ५० आमदार निवडून आणण्याची ताकद होती. राहुल यांच्या भारत जोडो यात्रेचा लाभ आणि केंद्रातील भाजप सरकारच्या विरोधात शेतकरी आणि अन्य विषयांवरून निर्माण झालेली नाराजी यामुळे काँग्रेसला अत्यावश्यक असलेला बूस्टर मिळाला. मागच्या निवडणुकांमध्ये चौथ्या क्रमांकावर फेकली गेलेली काँग्रेस लोकसभा निवडणुकीत पहिल्या स्थानावर आली आहे. दिल्लीतही लोकसभेत काँग्रेसने शंभरी गाठली. राहुल गांधी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत प्रथमच लोकप्रियतेच्या बाबतीत शिखरावर पोहोचले आहेत. 'मूड ऑफ नेशन' नावाच्या एका आपली संख्या मग ती आघाडीची किंवा वैयक्तिक यावर अधिक भर देण्याचा पवार गटाचा आणि काँग्रेसचा प्रयत्न आहे. ठाकरे गटानेही तूर्त त्यावर लक्ष देणेच योग्य. कारण महायुती - महाविकास आघाडी या दोघांमधील राजकीय शत्रुत्व शिगेला पोहोचलेले दिसत आहे. दोन्हीकडे नेतेमंडळे एकमेकांवर कुरघोडी करताना कुठे कमी पडत नाहीत. एकमेकांच्या आरोप प्रत्या आरोपाला ते तेवढाच ताकदीने सामोरे जाताना दिसत आहेत. या दोन्हीकडे अति उत्साही नेत्यांमुळे एकमेकांवरील आरोप प्रत्यारोप करण्याची पातळी ही बऱ्यापैकी खालवली आहे. मात्र त्यावर कसलेही सुधारणा न करता ते एकमेकांना मिळत आहेत. याचाच अर्थ येणाऱ्या नोव्हेंबर मधील विधानसभा निवडणूक कमालीची गाजणार हे नक्की. त्यासाठी महाराष्ट्राचा आगामी मुख्यमंत्री कोण याची चाचपणी दोन्हीकडे सुरू आहे. लोकांमध्ये कोणाला मुख्यमंत्री म्हणून पहायचे हे देखील दोन्हीकडून तपासले जात आहे. हा चेहरा दाखवण्यासाठी महाविकास आघाडीतील तीनही घटक आणि महायुती मधील तिन्ही घटक स्ट्रॉंगपणे पाऊल टाकत आहेत. याबाबत मुद्दामून चर्चा देखील घडवून आणली जात आहे. परंतु हे सर्व आगामी मुख्यमंत्री कोण यासाठी जरी चालले असले तरी ते ठरवण्याचे ताकद केवळ मतदारांमध्ये आहे हे मात्र या दोन्हीकडे पक्षांनी विसरता कामा नये. मतदारांना जो चेहरा मुख्यमंत्री म्हणून आवडेल तो ते असे उघडपणे कधीच सांगणार नाहीत. केवळ कृती मधून दाखवून देतील. त्यामुळे दोन्हीकडे पक्षांनी सावधपणे मुख्यमंत्री पदाचा चेहरा पुढे करणेच जास्त शहाणपणाचे ठरणार आहे.

# यंदाच्या गणेशोत्सवात निवडणुकीचा प्रचार...



## महापालिकायन

सुनील शिंदे

मोबाईल नंबर–९८२१९९६११७

भारताच्या सांस्कृतिक जीवनात मानाचे स्थान मिळविलेल्या आणि महाराष्ट्रासह देश परदेशात भक्तिभावाने भावाने साजरा होणारा आणि आपली १३० वर्षांची परंपरा कायम ठेवणारा गणेशोत्सव शनिवारपासून मोठ्या थाटामाटात जल्लोषात व उत्साहाने साजरा होताना दिसत आहे. मुंबई, पुणे, आणि कोकणात मोठ्या प्रमाणात तो साजरा केला जातो. मुंबईत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची लगबग गेल्या महिना दोन महिन्यांपासून सुरू होती.

तर कोकणातील मुंबईकर चाकरमानी घरी परंपरेप्रमाणे गणपतीची प्रतिष्ठापना करण्यासाठी १०-१५ दिवस आधीच तयारीसाठी रवाना झाले होते. कोकणासाठी रेल्वेने अतिरिक्त गाड्या सोडल्या तरी अनेकांना वेटींग लिस्ट ची तिकिटे मिळाली होती. तर काहींनी स्वतःची तसेच भाड्याची वाहने घेवून घर गाठले आहे. कोकणी माणूस तसा उत्सव प्रेमी आहे. मुंबईत नोकरी धंद्यानिमित्ताने वास्तव्याला असला तरी प्रत्येक सणाला त्याचे पाय गावाकडे ओढले जातात. गणपती, शिमगा, दत्त जयंती या सणाला तर चाकरमानी हमखास कोकणात गावाला जातच असतो. आणि आनंदात आपला सण साजरा करून पुन्हा मुंबईत आपला रोजगार सुरू करतो. तसा यंदा ही कोकणी माणूस गावाला गेला आहे. त्यामुळे मुंबईत लोकल ट्रेनला ही गर्दी कमी झालेली दिसत आहे. तर मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी नेहमी प्रमाणे उंचच उंच गणरायाच्या मूर्ती आधीच विराजमान केल्या होत्या. गेल्या शनिवारी व रविवारी ट्रक, टेम्पो मधून गणरायाला जल्लोषात आणि जयजयकार करत घेऊन जातानाचे दृश्य सर्वत्र दिसत होते. गणपतीची उंची पाहता त्यासाठी करण्यात येणारी सजावट करणे सोपे जावे म्हणून मंडपात आधीच मूर्ती आणून ठेवणे ही प्रथा आता काही नवीन राहिली नाही. मात्र सर्वच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे हा गणेशोत्सव ही जल्लोषात साजरा व्हावा म्हणून झटत होते. दरवर्षी प्रमाणे मुंबई महानगरपालिका, बेस्ट उपक्रम यांनी समुद्र ,तळी येथे विविध सोयी सुविधा प्रदान केल्या आहेत. यावर्षी सुद्धा गोरेगांव पूर्व येथील आरे कॉलनी आणि बोरिवली च्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील तळे गणपती विसर्जनासाठी बंदच ठेवण्यात आले आहे. म्हणे त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहचते असे सरकारचे म्हणणे आहे. खरे तर आरे कॉलनीचा विचार केला तर तलावाशेजारीच असलेल्या तेथील मुख्य रस्त्यावरून अव्याहतपणे वाहनांची ये जा सुरू असते. तेथील रस्त्यावरील खड्ड्यातून ती धावत असतात.त्याचा संपूर्ण धूर आणि धूळ उडत असते. पाऊस पडला असल्यास तिथला संपूर्ण परिसर चीखळमय होत असतो. आरे मध्ये अनेक ठिकाणी म्हैसीचे तबेले आहेत. या तबेल्यामुळेही प्रदूषण वाढते. मग गणपती विसर्जनासाठीच तलाव बंद का, हा प्रश्न पडतो. यंदाचा गणेशोत्सव साजरा करताना कोणत्याही प्रकारचे विघ्न येऊ नये. बाप्पाला ज्या भक्तिभावाने आणले त्याच भक्तिभावाने त्याचे विसर्जन ही व्हावे. अशी सर्वच जण करुणा भाकत असतात.ही करुणा फळास येईल. व यंदाचा गणेशोत्सव भक्तिमय वातावरणात, आनंदात, जल्लोषात कोणतीही विघ्ने न येता पार पडेल. अशी आपण सर्वच जण आशा करूया.

**विधानसभा निवडणुकीचे माहौल**

मुंबईतील गणेशोत्सवाला जल्लोषात सुरुवात झाली हे खरे, पण यंदाच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला विधानसभा निवडणुकीची जोड मिळाल्याचे दिसत आहेत. खरे तर अद्याप विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर झालेली नाही. विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संपत असली तरी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभा निवडणूक नोव्हेंबर महिन्यात म्हणजे दिवाळी संपल्यानंतर घेण्यात येईल असे सूतोवाच केले असले तरी राज्यातील वातावरणाचा आढावा घेतल्याशिवाय निवडणूक आयोगाला ते हिरवा कंदील दाखवतील असे संभवत नाही. कारण मुख्यमंत्र्यांनी आपल्या लाडक्या बहिणींना महिना १५०० रुपये द्यायला सुरुवात केली असली तरी बदलापूर येथील लहान मुलींवर झालेला अत्याचार आणि त्यानंतर रोज उघडकीस येत असलेली बलात्काराची प्रकरणे तसेच कुठे ना कुठे होत असलेली गोळीबाराची प्रकरणे राज्यातील कायदा सुव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगत असताना दिसत आहेत. त्यातच मालवणच्या राजकोट येथे आपल्या सर्वांचे दैवत , जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांचा केवळ आठ महिन्यांपूर्वी उभारलेला पूर्णाकृती पुतळा कोसळल्याने इथल्या प्रत्येकाच्या काळजाला ठेच पोहचली आहे. पण त्याचे खापर शिल्पकार व सल्लागार यांच्यावर फोडून त्यांना जेल मध्ये टाकण्यात आले आहे. पुतळा बनविण्यासाठी दोन अडीच वर्षाचा काळ लागत असताना लोकसभा निवडणुकी पूर्वी पुतळ्याचे अनावरण झाले पाहिजे. म्हणून लवकर पुतळा तयार करून द्या म्हणणारे इथे दोषी असताना शिल्पकार व सल्लागार यांना दोषी ठरवण्यात आले आहे. याची पुरेपूर कल्पना राज्यातील जनतेला आहे. या घटनांमुळे लाडक्या बहिणींची विश्वासार्हताही सरकार गमावून बसले आहे.तसेच तो विषय सुद्धा या प्रकरणामध्ये लोप पावल्याचे दिसून आले. त्यामुळे विधानसभा निवडणूक मुख्यमंत्री जरी नोव्हेंबर मध्ये होतील असे म्हणत असले तरी ती सरकारकडून सहा महिने ती पुढे ढकलली गेली तरी कुणाला आश्चर्य वाटणार नाही. पण यंदाच्या गणेशोत्सवात या विधानसभा निवडणुकीचे प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते. सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होत असलेल्या परिसरात सर्वच राजकीय पक्षाच्या लोकांनी तसेच भावी उमेदवारांनी आपली छबी ठळकपणे दिसेल अशी मोठ मोठी गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा देणारे होल्डिंग्स लावल्याने तिथे होल्डिंग्स ची गर्दी झालेली दिसत आहे. खरे तर हा त्यांच्या प्रचाराचा भाग आहे. तरीही ही होल्डिंग्स लावताना मुंबई महानगरपालिकेच्या परवाना विभागाकडून योग्य ते शुल्क भरून परवानगी घ्यावी लागते ती या राजकीय मंडळींनी घेतली नसल्याचे समजते. धार्मिक उत्सवात विघ्न नको म्हणून त्यावर पालिकाही कारवाई करणार नाही पण त्यामुळे पालिकेला मिळणारा महसूल बुडाला आहे. गणेशोत्सव संपल्यानंतरही ही राजकीय मंडळी हे होल्डिंग्स काढत नाहीत. मुंबईला विद्रूप करणारे हे होल्डिंग्स मग पालिकेलाच काढावे लागतात. त्यासाठी येणारा खर्चही पालिकेलाच करावा लागणार आहे. हे चित्र दर पाच वर्षांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर दिसत असते. तसे ते यावेळीही दिसत आहे. म्हणून पालिका नियमांची पायमल्ली करणे योग्य आहे असे वाटत नाही.

**पालिकेची जय्यत तयारी**

मुंबई महानगरपालिका मुंबईकरांना नागरी सेवा सुविधा पुरवीत असताना. सामाजिक बांधिलकी ठेवून आपले कर्तव्य पार पाडत असते. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही पालिकेने आपली बांधिलकी जपली आहे. मुंबईतील श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक विविध सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ रोजी अनंत चतुर्दशी दिनी होणा-या श्री गणेशमूर्ती विसर्जनासाठीही महानगरपालिकेकडून विशेष तयारी करण्यात आली आहे. विसर्जन सुलभ, निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी, ७१ नियंत्रण कक्ष तसेच अन्य विविध सोयीसुविधा उभारण्यात आल्या आहेत. यंदा गणेश मूर्ती विसर्जनासाठी ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर व्यवस्था करण्यात आली आहे. मुंबईत गिरगाव, दादर, माहीम, वर्सोवा, गोराई आदी समुद्र किनाऱ्यांवर ही मोठ्याप्रमाणात लहान मोठ्या गणपतींचे विसर्जन करण्यात येते.त्यामुळे या समुद्र किनाऱ्यावरही भाविकांसाठी विविध नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी येणारे वाहन चौपाटीवरील वाळूमध्ये अडकू नयेत व श्री मूर्तींचे विसर्जन सुरळीतपणे पार पडावे, याकरीता चौपाटीच्या किना-यांवर ४७८ स्टील प्लेट तसेच छोट्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी विविध ठिकाणी ४३ जर्मन तराफ्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. चौपाट्यांवर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ७६१ जीवरक्षकांसह ४८ मोटरबोटी तैनात केल्या आहेत. विसर्जनापूर्वी भाविकांनी अर्पण केलेले हार, फुले इत्यादी निर्माल्य जमा करण्यासाठी १६३ निर्माल्य कलशांसह २७४ निर्माल्य वाहनांचीही सोय करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या विविध खात्यातील कर्मचा-यांमध्ये योग्य तो समन्वय साधण्यासाठी मुख्य नियंत्रण कक्षासह प्रशासकीय विभागांच्या स्तरावर १९२ नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर सुरक्षेच्या दृष्टीने ६६ निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत. विविध ठिकाणी ७२ स्वागत कक्ष तयार करण्यात आले आहेत. आरोग्य विभागाकडून ७५ प्रथमोपचार केंद्रांसह ६७ रुग्णवाहिका देखील सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. प्रभावी प्रकाश योजनेसाठी 'बेस्ट' च्या सहकार्याने खांबांवर व उंच जागी सुमारे १,०९७ फ्लडलाईट आणि २७ सर्चलाईट लावले आहेत. विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी १२७ फिरती प्रसाधनगृह सज्ज ठेवण्यात आली आहेत. त्याचबरोबर आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे अग्निशमन दलाच्या सुसज्ज वाहनासहीत प्रशिक्षित मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहेत.

याशिवाय यावेळी प्रथमच 'क्यू आर कोड'द्वारे देखील भाविकांना, गणेश भक्तांना कृत्रिम तलावांची माहिती मिळणार आहे. हा 'क्यू आर कोड' स्कॅन केल्यावर मुंबईतील कृत्रिम तलावांची माहिती आणि गुगल मॅप लिंक भाविकांना उपलब्ध होणार आहे. यामुळे मुंबईतील यंदाचा गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक होण्यासाठी मदत होणार आहे. त्याच बरोबर सामाजिक एकोपा रहावा, स्वच्छता, आरोग्य या विषयी जनजागृती व्हावी म्हणून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना देखावा उभारण्याचे आवाहन करून त्यांना समारंभपूर्वक चषक व रोख पारितोषिके देवून त्यांचा सन्मान करते. पालिकेची ही सामाजिक बांधिलकी गणेशोत्सवाला पूरक अशीच आहे. गणेशोत्सवाला कोणतेही गालबोट लागू नये. तो शांतीपूर्वक पार पडेल. अशी आशा करू या!

# पत्र मानस

## चाकरमान्यच्या समस्यांकडे शासन लक्ष देईल काय!

मुंबई गोवा मार्गाचे काम गेल्या 13 वर्षा पासून राखडले आहे. अजूनही रस्त्याचे काम मार्गी लागत नाही. पावसामुळे महामार्गची अवस्था बिकट झाली आहे. खड्डे पडले आहेत. ते भरण्याचे काम सुद्धा सुरु झालेले प्रवास करताना दिसलें, असे असले तरी काही ठिकाणी रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे वाहने विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनच्या मार्गांवरून वळवावी लागत आहेत. त्याचे पुरेसे फलक आणि व्यवस्था नसल्यामुळे चाकरमान्याना ट्राफिक च्या समस्सेला तोंड द्यावे लागत आहे. दरवर्षी कोकण वासियांचे प्रवास करताना हाल होतात. प्रवाशांना एकठिकाणी 2 ते 3 तास रहदारीमुळे लागत असेल तर चालेल्या कामावर प्रश्न चिन्न निर्माण होतो. गावाकडे जाताना चाकरमानी गणपती साठी डेकोरेशन, आवश्यक साहित्य बसने स्वतःच्या गाडीने नेत असतो. कोकणवासिय ठरवलेल्या वेळेत घरी पोचला असे होत नाही. शासनाने जादा ट्रेन सोडल्या असल्यातरी त्या कोकण वासियांसाठी पुरेस्या नाहीत. कोकण वासियांची या समस्सेतून सुटका कधी होणार हे शासनाने कोकण वासियांना सांगावे.

**- सुनील शिंदे, पनवेल**

## हे थांबलेच पाहिजे !

वर्तमानपत्रात बलात्कार, विनयभंग यांच्या बातम्या येतात, मोर्चे काढले जातात, मेणबत्या पेटवल्या जातात आणि पुन्हा काही दिवसांनी तेच घडते. हे थांबलेच पाहिजे त्याकरता मुलांना व मुलींना संस्कार, स्वसंरक्षण दिले गेले पाहिजे. मुलगा कितीही वर्षाचा असो, घडलेल्या घटने पासुन एक महिन्यात त्यास जबर भरचौकात फाशीचीच शिक्षा व्हावयास हवी कारण असले कृत्य बालसुलभ नक्कीच नाही. आज पर्यंत अनेक अमानुष अत्याचार झाले व होत आहेत पण त्यावर अजुनपर्यंत उपाय सापडु नये ही खरी शोकांतिका होय. घराबाहेर, घरात, शाळेत, कार्यालयात, रसत्यावर वा कुठेही मुलींना, बायकांना सहज सावज करता येते व कोण आपले काही वाकडे करु शकत नाही या आत्मविश्वासावर अनेकांची हिंमत वाढते. २०२३ मध्ये महाराष्ट्रात बलात्काराच्या ७,५२१ तर विनयभंग आणि अवमानाच्या ५,२०९ घटना नोंदवल्या गेल्या, नोंद न झालेल्या घटना याहुनही जास्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही. २०२२ मध्ये गुन्हे सोडवण्याचे प्रमाण महाराष्ट्रात ८१ टक्के होते. कित्येक घटना दाबल्या जातात. स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षांनी सुध्दा स्त्री सुरक्षित राहु शकणार नसेल तर या स्वातंत्र्याला काहीच अर्थ नाही. तरुणांमध्ये वाढत चाललेली बेरोजगारी, घरच्यांशी, नातेवाईकांशी होत चाललेला दुरावा, मानसिक आधाराचा अभाव, छंदाचा अभाव, समाज माध्यमांचा नको तितका पगडा ही काही प्रमुख कारणे त्यामागे आहेत. आपली एकत्र कुटुंब पध्दती खुप छान आहे त्यामुळे मोठयांचा धाक राहतो, आपसुक चांगले संस्कार मुलांवर होत असतात म्हणुन ती भरकटत नाहीत. मुलींनी, महिलांनी स्वतःत बदल करायला हवे, स्वसंरक्षण शिकुन, आत्मसात करुन तशी कृती घडत असेल तर स्वतःसाठी व इतरांसाठी उभ रहायला हवे. शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, आर्थिक सर्व प्रकाचे अत्याचार तिच्यावर होत असतात. तिला कणखर होऊन तिच्या अस्तित्वासाठी आत्ताच झगडावे लागेल. सर्व प्रकारचे अत्याचार आता थांबलेच पाहिजेत. बलात्काराच्या गुन्ह्याला फाशी शिवाय पर्याय नाही मग तो बालीक असो वा ना बालिक. काहींना शिक्षा झाल्यास ही वृत्ती कमी होऊन एक दिवस नक्कीच लोप पावेल.

**- लीना वालावलकर, कांदिवली, मुंबई**

## पोलिसांवर हल्ले चिंताजनक

कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ले,मारहाण होण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत.पोलीस कर्मचारी एखाद्या संशयित आरोपीस अटक करण्यासाठी तसेच भांडण सोडविण्यासाठी गेले असता तसेच वाहतूक पोलिसांनी वाहन चालकाने नियम भंग केल्यास दंड आकारला असता काहीजण वाद घालून पोलिसांना मारहाण करतात ही बाब चिंताजनक आहे.नुकताच उल्हासनगर मध्ये मद्यपी रिक्षा चालकांनी वाहतूक पोलिसाला मारहाण करण्याचा प्रकार घडला.या, पूर्वीही राज्यात असे प्रकार घडलेले आहेत.मद्य सेवन केलेले,भडक डोक्याचे, तापट स्वभावाच्या व्यक्तींचा वाद होताना राग अनावर होऊन त्यांच्याकडून पोलिसांवर हात उगारला जातो.अशा व्यक्तींना मारहाण, हल्ले करताना कायद्याची,शिक्षेची भीती वाटत नाही. जनतेत पोलिसांची जरब असावयास हवी.पोलीस कायद्याचे पालन,जनतेचे संरक्षण करत असतात.त्यांच्यावर हल्ले ,मारहाण झाल्यावर त्याचे मनोबलावर परिणाम होत असतो.म्हणूनच पोलिसांवर झालेले हल्ले,मारहाण प्रकरणात मारहाण,हल्ले,वर्दीवर हात टाकणाऱ्यांवर कडक कारवाई होणे तसेच त्यांना जामीन न देता शिक्षा होणे आवश्यक आहे.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव मुंबई**

## पवार व काँग्रेस ठाकरेंची फसवणूक करतायेत का?

सध्या मुख्यमंत्री पदाच्या चेहऱ्यावरून महाविकास आघाडीत मतभिन्नता दिसून येते. कारण उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्याची भूमिका स्पष्ट केल्यावर ती दोन्ही मित्र पक्षांनी फेटाळून लावल्याचे दिसते. त्यावर शरद पवारांनी विधानसभेतील विजयी संख्या बळा नुसार निर्णय घेतला जाईल असे मत मांडले. तर काँग्रेसने निवडणुकीपूर्वी चेहरा जाहीर करण्याचे धोरण पक्षात नसल्याची भूमिका मांडली. यावरून दोन्ही मित्रपक्ष ठाकरेंची कोंडी करीत असल्याचे स्पष्ट दिसते. वास्तविक पाहता ठाकरेंनी त्यांना युतीचा आलेला २५ वर्षांचा अनुभव कथन केला होता. जनतेला महायुतीचे सरकार घालवायचे असल्याने महाविकास आघाडीकडे ती आदराने पाहते. परंतु भारतीय संसदीय लोकशाहीत निवडणुकीआधी चेहरा जाहीर करण्याची पद्धत नाही हे लक्षात घ्यावे. सध्या पवारांच्या पक्षात येणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने त्यांनी तसा निर्णय घेतला असावा. त्यांना आपल्या मुलीला राज्याची पहिली महिला मुख्यमंत्री करण्याची सुप्त इच्छा आहे. त्यासाठीच ते निवडून येण्याची क्षमता असलेल्या नेत्यांना आपल्या पक्षात घेऊन स्वतःची बार्गेनिंग पॉवर वाढवत आहेत. ज्यायोगे त्यांचे संख्याबळ वाढून अजित पवारांना योग्य तो धडा मिळेल. भाजप विषयी संताप जनक अनुभव पाठीशी असल्याने ठाकरेंनी भाजपला धडा शिकविण्यासाठी महाविकास आघाडीत स्थान मिळवले. अर्थात याची त्यांना जबर किंमत मोजावी लागली. त्यांनी पक्षाचे नाव व चिन्ह गमावले. त्यांची भूमिका काँग्रेस व राष्ट्रवादी दोघांनीही समजून घेणे उचित ठरेल. ठाकरेना असलेल्या सहानुभूतीच्या लाटेचा मात्र मित्र पक्षांनी चांगलाच लाभ उठवला. त्यामुळे जनमानसात आजही त्यांना आदराचे स्थान आहे. त्यांच्या याच लोकप्रियतेचा फायदा घेण्याचा मित्र पक्षांचा मनसुबा दिसतो. तसे पाहता शरद पवारांना जर सहानुभूती असती, तर त्यांना उमेदवार आयात करण्याची गरज भासली नसती. सध्या निवडून आलेल्या खासदारांमध्ये बहुसंख्य हे दुसऱ्या पक्षातून आलेले आहेत. परिणामी ठाकरेंची कोंडी झाल्यामुळे त्यांना महाविकास आघाडीतून बाहेर पडणे आता सोपे नसून स्वबळावर बहुसंख्य आमदार निवडून आणणे सुध्दा कठीण आहे. त्यातच शिंदेंच्या पक्षात गेलेले नेते आजही तेथे टिकून आहेत. ठाकरेंनी गद्दारांना परतीचे दरवाजेही बंद केले असल्याने आव्हानात्मक स्थिती आहे. काँग्रेसचा आत्मविश्वास वाढल्याने त्यांनाही यशाची खात्री वाटत असावी. त्यातच सर्वोच्च न्यायालयाकडून निकालाची अपेक्षा पूर्ण होत नसल्याने त्यांच्या पदरी निराशाच वाढताना दिसते. लोकसभेत जीवापाड मेहनत घेऊनही त्याचा फायदा मित्र पक्षांनाच झाला. कारण मित्र पक्षांनी आपली मते ठाकरेंकडे वळवलीच नाहीत. परिणामी त्यांच्या बऱ्याच जागा कमी झाल्या हे वास्तव आहे. त्यामुळे भविष्यात जागा वाटपातही मित्र पक्ष त्यांची फसवणूक करण्याची दाट शक्यता वाटते. फक्त मुंबईत जास्त जागा देऊन ग्रामीण भागात त्यांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. विशेषत: पवारांचा अंदाज वर्तवणे कठीण आहे. त्यांचे विश्वासघातकी राजकारण उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे.

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

## शिखर कुंज सोसायटीत गणेशोत्सव श्रद्धा व भक्तिभावातुन साजरा

**मुंबई :** मुंबईत ठिकठिकाणी बसवलेल्या गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी लोक मोठ्या संख्येने येत आहेत. या वर्षीही मालाड पूर्व येथील शिखर कुंज सहकारी गृहनिर्माण संस्थेने भव्य गणपती बाप्पाची स्थापना केली आहे. समितीचे अध्यक्ष डॉ.अनिल काशी मुरारका यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या २६ वर्षांपासून अखंडपणे गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना व भक्तीभावाने केली जात आहे. दर्शनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांच्या सोयीसुविधांची समिती पूर्ण काळजी घेत आहे. मुरारका म्हणाले की, आपण सर्वजण हा सण देशाच्या शांती आणि समृद्धीसाठी प्रार्थना करून साजरा करत आहोत. सोसायटीचे सचिव सूर्या गर्ग, सीमा गोयल, संगीता मुरारका, कविता सिंघानिया, टीना अग्रवाल, ममता परश्रमका, बिंदू परासरामका, सीमा घोलियान, शिल्पा गर्ग, उत्तम परसरामका संघटक समिती म्हणून कैजर कोतवाल आपले महत्त्वाचे योगदान देत आहेत.





भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्या मुंबईतील निवासस्थानी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांनी गणेशोत्सवानिमित्त भेट दिली.



दहिसरमधील सामाजिक कार्यकर्ते रमाकांत पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या श्रीगणेशाचे मुंबईचे माजी महापौर हरेश्वर पाटील यांनी दर्शन घेतले. यावेळी शाल श्रीफळ देऊन मा.हरेश्वर पाटील यांचा सन्मान करण्यात आला.



अंशूलचा राजा, महावीर नगर, कांदिवली पश्चिम, वर्ष ३ रे.... दरवर्षी इको फ्रेंडली मूर्ती आणि सजावट



पाडावे परिवार वाणी वाडी, ता. वैभववाडी, जिल्हा सिंधुदुर्ग यांच्या घरी विराजमान झालेली श्री गणराय

### ऐन गणेशोत्सवात कर्जतमध्ये भीषण तिहेरी हत्याकांड

# निर्दयी मारेकऱ्यांनी कुटुंबातील गर्भवती मातेलाही संपवले

#### मृतदेह नाल्यात फेकले ,संपूर्ण कर्जत तालुका हादरला



प्रतिनिधी
■ कर्जत

गणेशोत्सवाचा आनंदोत्सव आणि धामधूम सुरू असताना कर्जत तालुका तिहेरी हत्याकांडाने हादरला आहे. तालुक्यातील चिकणपाडा गावच्या हद्दीत एकाच कुटुंबातील तिघांची हत्या करून गावच्या नाल्यात मृतदेह टाकण्यात आल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. तर निर्दयी मारेकऱ्यांनी या कुटुंबातील गरोदर मातेलाही संपवले असल्याने या घटनेने तालुका हादरला आहे.

कर्जत तालुक्यातील नेरळ शहरापासून काही अंतरावर चिकणपाडा गाव आहे. या ठिकाणी मदन जैतू पाटील वय 35 हा तरुण आपली पत्नी अनिशा (माधुरी ) मदन पाटील वय २८ व मुलगा विवेक पाटील वय ९ वर्ष यांच्यासह राहत होता. मूळचा कळंब बोरगाव येथील हे पाटील कुटुंब गेली १५ वर्ष चिकणपाडा येथे राहत होते.

रविवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता चिकणपाडा गावातील नाल्यामध्ये या तिघांचेही मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ माजली आहे. नाल्यातील मृतदेह पाहून ग्रामस्थांनी तत्काळ नेरळ पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी मृतदेह नाल्यातून बाहेर काढल्यावर या तिघांच्याही अंगावर जखमांचे व्रण होते. त्यामुळे ही हत्याच असल्याचे पडसाद उमटत आहेत. मदन पाटील हा तरुण शांत स्वभावाचा म्हणून प्रसिद्ध होता. तेव्हा अशा पद्धतीने त्याचा अंत झालेला पाहून ग्रामस्थ देखील हळहळले. यासह मदन याची पत्नी अनिषा ही ७ महिन्यांची गरोदर होती. तिलाही मारेकऱ्यांनी सोडले नाही. नेरळ पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात पाठवले आहेत. तर याबाबत नेरळ पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवाजी ढवळे हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत. दरम्यान पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह कर्जत उपविभागीय पोलिस अधिकारी डि डी टेळे यांनी घटनास्थळी भेट देत घटनास्थळाची पाहणी केली.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन



प्रतिनिधी
■ पुणे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आळंदी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधीचे दर्शन घेऊन पूजा केली. यावेळी संस्थान समितीच्यावतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची प्रतिमा देऊन मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजन नाथ आदी उपस्थित होते.

# उपायुक्तांच्या केबिनमध्ये राडा 100 जणांवर गुन्हा दाखल

#### रस्यात उभ्या वाहनाला धडकून तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी
■ छत्रपती संभाजीनगर

उपायुक्तांच्या केबीन मध्ये घुसून घोषणाबाजी करणार्या १०० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. ६ सप्टेंबरला खोकडपुरा भागातील समाज कल्याण कार्यालयात हा प्रकार घडला. सचिन बनसोडे व त्याच्यासह आलेल्या शंभर जणांवर शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

प्रादेशिक समाज कल्याण उपायुक्त जयश्री सोनकवडे या त्यांच्या केबीनमध्ये क्षत्रीय अधिकार्यांच्या आढवा बैठक घेत होत्या. मागील दोन महिन्यांपुर्वी आरोपी सचिन बनसोडे यांनी ३६-३६ योजने अंतर्गत समाज कल्याण विभागात प्रस्ताव दाखल केला आहे. शासन निर्णयातील निकषानुसार तपासणी केली असता त्यामध्ये काही त्रुटी आढळुन आल्या. या त्रुटी निदर्शनास आणुन तसा प्रस्ताव समाज कल्याण विभागाला पाठविण्यात आला. सदर योजनेची अंमलबजावणी करणारे सहाय्यक आयुक्त पांडुरंग वाभळे यांना प्रस्तावातील त्रुटीचे पत्र देण्यात आले होते. त्यानंतर आरोपी हा जयश्री सोनकवडे यांच्या केबीनमध्ये आला व गोंधळ करून शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी जयश्री कुलकर्णी यांच्या तक्रारीनुसार सचिन बनसोडे व त्याच्या सोबत आलेल्या १०० महिला पुरूषांविरूध्द क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करत आहेत.

#### तासगाव मतदारसंघात तिसऱ्या आघाडी होणार

# रोहित पाटलांची विधानसभेची वाट बिकट, खासदार विशाल पाटील घोरपडेंच्या बाजूचे





प्रतिनिधी
■ सांगली

तासगाव कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिसरी आघाडी निर्माण होण्याची शक्यता आहे. माजी मंत्री अजित घोरपडे यांच्या नेतृत्वात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग होऊ शकतो. सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी देखील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी अजित घोरपडे यांच्यासोबत राहण्याचे जाहीर केले आहे. लोकसभेला जसा अजितराव घोरपडे यांच्याशिवाय पर्याय नाही तसा विधानसभेला देखील त्यांच्याशिवाय पर्याय नसल्याचे विशाल पाटील म्हणाले आहेत. तासगावच्या मणेराजुरी येथे आयोजित सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

तासगाव कवठेमहांकाळ मतदारसंघातून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते व स्वर्गीय माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांचे सुपुत्र रोहित पाटील यांना उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. मात्र आता खासदार विशाल पाटील यांनी केलेल्या विधानामुळे येथील राजकारणाला वेगळे वळण मिळत असल्याचे दिसत आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोहित पाटील आणि माजी खासदार संजय पाटील यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. मात्र आता या मतदारसंघात ही दोन्ही घराणी नकोत म्हणून तिसरी आघाडी अजित घोरपडे यांच्या नेतृत्वात तयार होताना दिसत आहे.

तासगाव तालुक्यातील सावर्डे येथे खासदार विशाल पाटील आणि माजी राज्यमंत्री अजितराव घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आघाडीच्या माध्यमातून लोकांसमोर पर्याय उभा करण्याचा तासगाव कवठेमंकाळ विधानसभा मतदारसंघात प्रयत्न सुरू करण्यात आला. मात्र या तिसऱ्या आघाडीमुळे रोहित पाटील यांना धक्का बसण्याची शक्यता आहे.

दरम्यान, तासगाव येथे झालेल्या दहीहंडी कार्यक्रमात संजय काका पाटील यांनी प्रभाकर पाटील यांना निवडणुकीत उतरवण्याचे सुतोवाच केले होते. त्यामुळे यंदाची निवडणूक आर.आर.पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील आणि प्रभाकर पाटील यांच्यात होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले होते. गेली अनेक वर्षे तासगाव-कवठेमहांकाळची आमदारकी स्व. आर. आर. पाटील यांच्या घरातच आहे. त्यांच्या विरोधात स्व. दिनकर (आबा) पाटील यांचा तसेच माजी खासदार संजय पाटील यांचा गट निवडणुकीत उतरत होता. अंजनी म्हणजे आर आर पाटील आणि चिंचणी म्हणजे संजयकाका पाटील या दोन्ही गावच्या नेत्यांनीच आजपर्यंत तालुक्यात आणि मतदारसंघाचे राजकारण केले आहे. मात्र यात आता तिसरी आघाडी निर्माण झाल्यावर मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

# 'मोदीजी बदलापूरवर बोला, देश परेशान आहे...'

#### पुरीच्या गणपतीमध्ये लाडकी बहीण योजना असतानाही महिलांवर अत्याचाराच्या घटनांवर सवाल



प्रतिनिधी
■ नागपूर

नागपुरातील गुलाब पुरी यांचा गणपती गणेश स्थापनेच्या निमित्ताने हाताळण्यात येणाऱ्या वादग्रस्त विषयांमुळे राज्यात प्रसिद्ध आहे. 66 वर्षांपूर्वी पाचपावली परिसरातील सामाजिक कार्यकर्ते गुलाब पुरी यांनी वादग्रस्त देखाव्यातून सामाजिक संदेश देणारा गणपती प्रतिष्ठापित करण्याची परंपरा सुरू केली. हा गणपती गणेश चतुर्थीच्या दिवशी स्थापना न करता गणेशोत्सवा दरम्यानच्या कुठल्याही दिवशी स्थापन केला जातो. त्यांचा मुलगा चंद्रशेखर पुरी ही परंपरा पुढे चालवित आहे.

संपूर्ण देश बदलापूर येथील मुलींवरील अत्याचाराच्या घटनेने हादरला आहे. त्या नंतर मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली. तशातच सरकारने लाडकी बहिण योजना आणली. एकीकडे लाडकी बहिण योजना असताना महिलांवरील अत्याचारात वाढ का, असा सवाल करणारा देखावा सादर करण्यात आला आहे. वेगळ्या विदर्भाची मागणी खूप जूनी आहे. राजकीय पक्षांचे त्याकडे दुर्लक्ष आहे. यावेळेस गणपतीलाच विदर्भाचा मुख्यमंत्री करण्यात आले आहे. विदर्भवाद्यांनी तिथे जय विदर्भच्या घोषणाही दिल्या आहे.

२०२२ मध्ये परंपरेप्रमाणे देखाव्यासह गणपती तयार केला. परंतु पोलिसांनी गणपती स्थापन होण्यापूर्वीच गणपती असलेल्या खोलीलाच कुलूप लावले होते. दरवर्षी गणपती स्थापन झाल्या नंतर मूर्ती व देखावे जप्त केले जातात. २०२२ मध्ये मात्र स्थापनेपूर्वीच कुलूप लावले होते.

पूर्वी गुलाब पुरी यांनी गणपतीची स्थापना केली की लगेच ती मूर्ती पोलिस जप्त करायचे. चंद्रशेखर आझाद गणेश मंडळाच्यावतीने पुरी हे गेल्या अनेक वर्षांपासून गणपतीची स्थापना करतात. त्यासोबत ज्वलंत सामाजिक समस्यांवर आधारित देखावेही असतात. १९९३ साली गुलाब पुरी यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांचे चिरंजीव चंद्रशेखर, नरेंद्र यांनी ही परंपरा कायम ठेवली आहे. २००५ साली न्यायालयाने पुरींना गणपतीची प्रतिष्ठापना करू देण्याचे आदेश दिले होते.



महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्टचे कार्यकर्ते देशमुख आणि परिवार यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली श्री गणेशाची सुंदर सुबक मूर्ती



गणेश हरी भोसले, भिवघर गांव, तालुका महाड, जिल्हा रायगड येथे विराजमान झालेलीश्री गणेशाची सुबक मूर्ती



नवीन मुंबई, सानपाडा, सेक्टर ९ मधील मिलेनियम टॉवर बी टाईप सोसायटीचा सार्वजनिक गणपती



विश्वास रमेश भाटकर यांच्या रत्नागिरी, पेठकिल्ला येथील निवासस्थानी विराजमान झालेली श्री गणरायाची श्रीकृष्ण रुपातील मनमोहक गणेशमूर्ती



सागर सदाशिव सोहनी, सचिन सुभाष सोहनी, भालचंद्र सुभाष सोहनी, अर्जुन सागर सोहनी आणि परिवार (कणकवली ) यांच्या घरी विराजमान झालेली सुंदर गणेश मूर्ती




वृत्तपत्र लेखक अनंत आंगचेकर यांच्या भाईंदर येथील घरचा श्री गणेश.



घाटकोपरचा राजा सेनोटरीयम लेन गणेशोत्सव मंडळाच्या भव्य दिव्य बाप्पा. मंडळाचे अध्यक्ष रवींद्र कोठावदे हे आहेत.

गोरेगांव पश्चिम येथील बेस्टनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदा ५५ व्या वर्षीही सामाजिक देखावा उभा केला आहे. मंडळ दरवर्षी भक्तांना बाप्पाला एक पेन व पुस्तक वाहण्याचे आवाहन करत असते. व ते नंतर गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येते. या वर्षी मंडळाने मिळालेल्या पेन व पुस्तकांचाच गाभारा तयार करून सामाजिक देखावा उभारला आहे. गणेशोत्सवानंतर हे पेन पुस्तके दरवर्षी प्रमाणे गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.





# साप्ताहिक भविष्य प्रवाह

वेदमुर्ती ज्योतिषालय



श्री पावशे शास्त्री (गुरुजी)
२१८/डी २,
सहयोग, डी -२, गोराई २,
बोरिवली (प)., मुंबई - ९२
मो. ७७३८००६४३४

**०९-०९-२०२४ते१५-०९-२०२४ (रविवार ते शनिवार)**

### मेष : हळुवार व्यवहार मार्गी लागतील.

ग्रहसंकेतपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना यशाचे प्रमान वाढते राहील.हा सर्व दिवसांचा कालावधी जेमतेम बरा राहु शकेल.या कालावधीत कोणतीही गोष्ट करताना भान ठेवावे लागेल. कदाचित नुकसानही या कालावधीत होऊ शकते.त्यामुळे सतर्क राहून काम करने बरे.तसा दिवसांचा कालावधी बरा असेल.पूर्वीचे व्यवहार करणे बाकी होते ते व्यवहार मार्गी लागु शकतील.कौटुंबिकस्तरावर वावरतांना गोड बोलत सामोरे जाणे अधिक पोषक ठरु शकेल.व्यवसायात अनेक मार्गांतून आलेले प्रस्ताव चांगले असतील. नोकरदार कामाच्या बाबतीत जबाबदारी पार पाडाल.

**महिला :** आर्थिकदृष्ट्या बचत करणे योग्य राहु शकेल.समाजसेवेची आवड राहील.संततीसौख्य लाभेल.नातेवाईकांशी कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होऊ शकतील.

**विद्यार्थी :** प्रकृती ठीकठाकअसेल.

**शुभदिनांक-१२-१३-१४.**

### वृषभ : मनोकामना अपूर्ण राहील.

ग्रहसंकेत पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना नाहक ओढाताान होऊ शकेल.ग्रहांची साथ तितकिसी नसेल.सध्या कोणत्याही कामाला उशीर हा ठरलेलाच असेल.कामे अगदी वेळेत पूर्ण होनार नाहीत,त्यामुळे तुम्हाला नाहक चिचिडिचा सामना करावा लागेल. कोणतेहीकाम करायला गेलात आळसामुळे होणार नाही.कामातील उत्साह वाढवावा लागेल.इतरांची मदत वेळेत मिळेलच असे नाही.प्रत्येक गोष्टीत करावी लागणारी धावपळ आताजरा वाढणारआहे.शांतपणाने निर्णय घेत चला.व्यवसायात प्रगतीचे प्रमान कमी होऊ शकेल.नोकरदार कामास ज्यादा वेळ काढावा लागेल.उपासना वाढवावी.

**महिला:**आर्थिक नियोजन मार्गी लावावे लागेल. संततीचे लाड जपुन करावेत. शिस्त बिघडू देऊ नका.घरगुती वाता वरण बरे राहील.मानसिक समाधान शोधावे लागेल.

**विद्यार्थी:**आरोग्य नरम राहील.

**शुभदिनांक-१३-१४-१५.**

### मिथुन : यशात वाढ संभवते आहे.

गिरहसंकेतपहाता सप्ताहाचा पूर्वार्धचांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना उत्साह वाढता राहु शकेल.शुभ ग्रहांची साथ बर्यापैकी आहे.बऱ्याच दिवसांपासून वाट प हात होता अशा गोष्टींचे चांगले संकेत संकेत मिळत आहे त.सध्याचे दिवस बरेआहेत असे म्हणायला हरकतनाही. ज्यावेळी सप्ताहात असे ग्रहमान असते अशा सप्ताहात एक संधी सोडायची नाही हे लक्षात ठेवावे.आलेल्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार केलेला बरा.यशासाठी फार वेळ लागणार नाही. अगदी वेळेत कामे पूर्ण होऊ शकतील.व्यवसायिकदृष्ट्या विशेष धावपळ होणार नाही.नोकरदार वर्गाला कामाच्या बाबतीत होणारा त्रास दूर होईल.

**महिला:**आर्थिक बाबतीत समाधानाची परिस्थिती असु शकेल.महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा होऊ शकेल.धार्मिक गोष्टींत उत्साहअसला तरी करण्यासाठी वेळ नसनार.

**विद्यार्थी:**आरोग्य बरे असेल.

**शुभदिनांक-०९-१०-११.**

### कर्क : लाभात वाढ होईल.

ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह अनुकुल जाऊ शकेल.नियोजित कामे कतांना समीकरण जुळून येऊ शकतील.या सर्व दिवसांचा कालावधी अतिशय उत्तम राहु शकेल.या कालावधीत जे काही करणार आहात त्या गोष्टीला नक्की चांगले यशमिळु शकेल.कारण एका दगडात दोन पक्षी मा
रण्याचा डाव साध्य होणार आहे.ही संधी बऱ्याच दिवसांतून आलेली आहे. सध्या सर्व समीकरण जुळून येणारे आहे.कौटुंबिकस्तरावर वावरतांना मनसोक्त आनंदाला उत्तम चालना मिळु शकेल.सामाजिक प्रतिष्ठेत वाढहोऊ शकेल. व्यवसायातील डावपेच अचूकतेने यशस्वी होऊ शकतील. नोकरदार काम नेहमीप्रमाने सुरळीत चालू राहु शकेल.

**महिला:**आर्थिकदृष्ट्या बचत करण्याचा प्रयत्न सफल होईल.कौटुंबिक वैवाहीकजीवन सुखाचे राहु शकेल.पतीचे सहकार्य लाभु शकेल.मानसिक समाधान लाभु शकेल.

**विद्यार्थी:**प्रकृती उत्तम साथ देईल.

**शुभदिनांक-१०-११-१२.**

### सिंह : व्यवहार सांभाळुन करावेत.

ग्रहबळ पहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना दुर्लक्ष होऊ देऊ नये.या दिवसांच्या कालावधीत कोणतीही घाई करून निर्णय घ्यायचे नाहीत हे लक्षात ठेवावे लागेल.अन्यथानुकसान होऊशकते. अनोळख्या व्यक्तीवर अजिबात विश्वास ठेवू नका.कौटुंबिकस्तरावर वावरतांना वादविवाद या गोष्टींपासून जरा लांबच राहाणे बरे.प्रत्येक गोष्टीत आपले तेच खरे करूनका.समोरच्याचे ऐकून घेण्याची मानसिकता जरी नसली तरी तुम्हाला ती मानसिकता वेळेवरच करून घ्यावी लागेल.व्यवसायात फार मोठी गुंतवणूक करू नका.नोकरदार वर्गाला कामात बदल करावे लागतील.उपासना सोडु नका.

**महिला:**आर्थिक बाबतीत व्यवहार चोख ठेवावेत.मित्र-मैत्रिणींचे सहकार्य मिळवावे लागेल.कुटुंबाची काळजी घ्या. जोडीदाराचा आदर करावा लागेल. मनमानी करु नका.

**विद्यार्थी:**प्रकृती स्वास्थ्य जपलेले बरे.

**शुभदिनांक-१२-१३-१४.**

### कन्या : संयम महत्वाचा असेल.

ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे कपतांना उगाचच चिडिड करुन नुकसान ओढवुन घेऊनका.कौटुंबिकस्तरावर वावरतांना विनाकारण मतभेद ताणू नका.हा सर्व कालावधी फारसा अनुकूल नाही. हे विसरु नका. तेव्हा घाईगडबडीने कोणती गोष्ट करायला जाऊ नका.इतरांनी काय करावे काय करू नये याचा सल्ला देत बसू नका.हा सल्ला तुमच्या अंगलट येऊशकतो. एखादी गोष्ट तुम्ही प्रत्यक्षात पाहात नाही तोपर्यंत त्या गोष्टीवर प्रतिक्रिया देऊ नका.खरेदी करताना भान ठेवावे. व्यवसायात खरेदी-विक्रीचे व्यवहार करताना मागीलअनुभव विसरू नका.नौकरदार आहेत्यात समाधान मानावे.

**महिला:**आर्थिकदृष्ट्या व्यवहार जपून करावेत.कौटुंबिक मतभेद उगाचच आणू नका.जोडीदाराच्या सल्ल्याने पुढे जाणे पोषक राहील,मानसिक ताण तणाव घेऊ नका. **विद्यार्थी:**प्रकृतीची काळजी घ्यावी.

**शुभदिनांक-१३-१४-१५.**

### तूळ : संबंध सुधारु शकतील.

ग्रहबळ पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना हळुहळु यशात वाढ होऊशकेल.या कालावधीत कदाचित द्विधावस्था निर्माण होऊ शकते,त्यामुळे कोणतेही निर्णय घाईने घेणे जमणार नाही.त्यापेक्षा याकालावधीत निर्णय न टाळलेले चांगलेहोऊ शकेल. तरिसुध्दा हे सर्व दिवस अतिशय उत्तम असु शकतील.या कालावधीत विचारकरुन निर्णय घेतल्यास यशस्वी होतील.अनेक दिवस रखडलेली कामे पूर्ण होऊ शकतील. कौटुंबिकस्तरावर वावरतांना चांगला प्रतिसाद मिळु शकेल. व्यवसायात फायद्याचे प्रमाण बर्यापैकी चांगले राहील.नोकरदार वर्गाला वरिष्ठांकडून कौतुकाची थाप मिळु शकेल.

**महिला:**आर्थिक प्रश्नचांगले सुटु शकतील.राजकीय क्षेत्रात यश मिळु शकेल. जेवढ्यास तेवढे राहावे.नातेवाईकांशी संवाद साधावा लागेल.नातेसंबंध सुधारु शकतील.

**विद्यार्थी:**आरोग्य ठीक राहील.

**शुभदिनांक-०९-१०-११.**

### वृश्चिक : सर्वस्तरावरआघाडी मिळेल.

ग्रहबळ पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना भरीव सफलता मिळवु शकाल.या सर्व दिवसांचा कालावधी शुभदायक राहु शकेल.काही वेळेला आपण जरी ठरवले की समोरच्याशी जेवढ्यास तेवढे राहायचे तर नेमके चांगल्या कालावधीत ही समोरची लोक तुमच्याशी खूप आदराने वागतात.त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो व भावनेच्या आहारी जाऊन सर्व काही बोलून रिकामे होतात.व या गोष्टी परत पुढे येतात. चांगल्या दिवसात चांगलीच आघाडी मिळवु शकाल. व्यवसायात नफ्याचे प्रमाण भरपूर चांगले राहु शकेल.नोकरदार वर्गाचे कामातील नियोजन यशस्वी होऊ शकेल.

**महिला:**आर्थिक लाभअपेक्षेप्रमाने होतील.रखडलेली कामे यशस्वीपने मार्गी लावु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सौख्य व समाधानात अविस्मरणीय वाढ संभवते.

**विद्यार्थी:**आरोग्य उत्तम राहील.

**शुभदिनांक-१०-११-१२.**

### धनू : निरर्थक विवाद टाळावेत.

ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना आत्मविश्वास उपयोगी पडु शकेल.यादिवसांच्या कालावधीत धरलं तर चावतंय-सोडलं तर पळतंय अशी अवस्था होऊ शकेल.काय करावे काय करू नये हे कळणार नाही.कारण निर्णय नाही घेतला तरी त्रास होणार आणि घेतला तरी त्रास होणार.मागील अनुभव न विसरता निर्णय घेतल्यास काहीही चुकीचे होणार नाही.कोणतेही काम असू द्या समाधान मिळेल,त्यासाठी उशीर लागणार आहे.तेव्हा दडपण घेऊन कामेकरू नका. व्यवसायात कदाचित अनपेक्षित लाभ होऊ शकतील. नोकरदार वर्गाचा कामातील व्याप बर्यापैकी वाढु शकेल.

**महिला:**उधारीचे व्यवहार टाळावेत.घरगुती वातावरण चांगले कसे राहील ते पाहावे लागेल.निरर्थक चर्चासत्र करत बसुन अडचनिंना आमंत्रण देऊ नये. कटाक्षाने टाळावे.

**विद्यार्थी:**आरोग्याची काळजी घ्यावी.

**शुभदिनांक-१२-१३-१४.**

### मकर : रागावर संयम हवा.

ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे कतांना मनमानी करु नये.सप्ताहातील सर्वच दिवस काळजीपूर्वक हाताळावे लागतील. इतरांवर अवलंबून कोणतीही गोष्ट साध्य होणार नाही.हे सदैव लक्षात ठेवावे. कौटुंबिकस्तरावर वावरतांना तर्कशुद्ध पद्धतीने विचार करत करत योग्य निर्णय घ्यावेत.प्रत्येक गोष्टीत एक घाव दोन तुकडे करून चालणार नाही.सध्या आपली डाळ शिजणार नाही.ज्या गोष्टीतून चांगले काही होणार आहे.अशाच गोष्टींना प्राधान्य द्यावे.नकारात्मक विचार काढून टाकावे. व्यवसायात चाललेल्या घडामोडीत जबाबदारीने पाऊल टाकावे लागेल.नोकरदार वर्गाने शांत राहून काम करावे.

**महिला:**आर्थिकबाबतीत उगाचच धाडसी निर्णय घेऊ नका.नातेवाईकांशी जेवढ्यास तेवढे राहावे लागेल.महत्वाच्या निर्णयात जोडीदाराची साथ मिळवावी लागेल.

**विद्यार्थी:**योग साधनेला महत्त्व द्यावे.

**शुभदिनांक-१३-१४-१५.**

### कुंभ : समंजसपना उपयोगी पडेल.

ग्रहप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना मिळतेजुळते घ्यावे लागेल.या कालावधीत जपून प्रत्येक पाऊल टाकावे लागेल.हे दिवस कसे अधिक चांगले घालवता येऊ शकतील.त्या दृष्टीने प्रयत्न करत चला.तुमचा राग वाढेल अशा गोष्टी तुमच्यासमोर या दिवसांत येऊ शकतात.तुमचा राग वाढू देऊ नका.एखादी गोष्ट आवडत नाही आणि तीच नेमकी समोर येणार असा प्रकार असल्यामुळे तुमची चिडचिड होऊ शकते. यशस्वी कामासाठी थोडा उशीर लागेल.व्यवसायात अविचाराने नको ते धाडस करू नका.नोकरदार वर्गाने आपले काम एके काम हे सूत्र लक्षात ठेवावे.

**महिला:**आर्थिक व्यवहार जपून करावेत.समाजमाध्यमांपासून लांब राहावे लागेल.मनोरंजनात आनंद मिळेल.

**विद्यार्थी:**आरोग्य बरे राहील.

**शुभदिनांक-०९-१०-११.**

### मीन : यशस्वी आठवडा असेल.

ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह चांगला जाऊ शकेल.नि योजित कामे करतांना जबाबदारी वागावेच लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदात चांगली वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांत येणारे प्रस्ताव यशस्वी असु शकतील. तरिसुध्दा जे काही करायचे आहे ते तुम्हाला शांत डोक्याने करायचे आहे. लाभात चांगली वाढहोऊ शकेल.शिवाय ज्या गोष्टीची तुम्हाला कल्पना नाही अशा गोष्टीवर विनाकारण चर्चा करत बसु नका किंवा कोणाला सल्ला देत बसू नका.सामाजिकस्तरावर सुप्रतिष्ठा वाढवु शकाल. व्यावसायिक यशस्वी बदल करावे लागु शकतील.नोकर दार वर्गाला नवीन यशस्वी कामाचा अंदाज येऊ शकेल.

**महिला:**मनमोकळेपणाने बोलल्यामुळे हलके वाटु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना संततीचे सौख्य लाभु श केल.घरगुतीस्तरावर वातावरण आनंदी राहु शकेल.

**विद्यार्थी:**तब्येत ठणठणीत राहील .

**शुभदिनांक-१०-११-१२.**

---

## तुझ्या चरणी पंधरा मिनिटे उभा राहीन एवढी श्रीमंती दे रे गणराया...



बाप्पाचा उत्सव म्हणजे भक्तांसाठी उत्साह असतो. श्रीगणेशाच्या आगमनाच्या दोन महिने आधीच बाप्पा तुझे भक्त तुझी आतुरतेने वाट पाहतात. तू सर्वांच्या हृदयात आहेस , जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी ..सर्वत्र भरून आहेस .. पण तरीही बाप्पा मातीच्या स्वरूपातील तुझे गोजिरे , साजिरे रूप पाहण्याचा आनंद काहीसा वेगळाच असतो. तुझी सोंड , तुझे कान , तुझे पोट आणि तुझ्या हातातील त्रिशूळ , मोदक आणि विशेष म्हणजे तुझे विविध सिंहासन पाहिल्या नंतर मनाला आनंद होत असतो. डोळे भरून तुला पाहावेसे वाटते. कधी कधी तुझ्या कुशीत सुद्धा एक छानशी झोप घ्यावी अन तू अंगाई गाऊन आम्हाला थोपटाव असे वाटते रे.. कारण भगवंता तूच एक असा देव आहेस जो आम्हाला सर्वांना जवळचा वाटतो. लहान थोर सर्वांनाच तू हवाहवासा वाटतोस. कारण तेहत्तीस कोटी देवापैकी तुलाच का रे पूजतात , तुझीच का वाजत गाजत मिरवणूक काढतात .. तुझ्या निष्ठेच्या, संस्काराच्या गोष्टी आम्ही लहान पणापासून आज्जी आजोबा कडून ऐकून आहोत. आई वडिलांना जग मानून त्यांना प्रदक्षिणा घालून वंदन करणारा श्रीगणेशा.. तुझ्या याच संस्काराची बीजे जन्मापासून आमच्या मनावर रुजवली जातात. त्यामुळे आमच्या आज्जी आजोबाच्या गोष्टीतला, पुस्तकातला , श्रीगणपती बाप्पा पाहण्यासाठीच आमची गर्दी असते. मात्र गेल्या काही वर्षापासून या गर्दीत बाप्पा आम्ही तुडवले जात आहोत.

नव्हे नव्हे रात्रभर दर्शनाच्या रांगेत उभे राहून तुझ्या चरणा पर्यंत पोहोचतो रे पोहोचतो तोच तुझ्या भवती असणारे मंडळांचे कार्यकर्ते , सुरक्षा रक्षक तुझ्या चरणाशी एक मिनिट सुद्धा उभे राहून न देता सरळ ढकलून देत बाहेर काढतात. मग शेवटी तुझं स्वरूप डोळ्यां मध्ये साठवत आम्ही निमुटपणे बाहेर पडतो. बाप्पा श्रीमंत .. गरीब असा तू कधीच भेद भाव केला नाहीस आणि करणारही नाहीस. गेल्या दहा बारा वर्षांपासून तुझ्या कडे मोठ मोठे उद्योगपती , सिनेस्टार, राजकारणी , मंत्री , अधिकारी येत असल्याने आता त्यांच्यासाठी वेगळी रांग अर्थात तुझे उजवे चरण सदैव या लोकांसाठी तासनतास दर्शनासाठी दिले जाते. तिथे सामान्य एक सेकंद काय उभा राहील. इतकेच काय तर गर्दीत कुठली घटना घडू नये म्हणून तुझ्या सुरक्षेसाठी उभे असणाऱ्या पोलिसांना देखील या गर्दीत रेटावे लागते. कधी कधी धक्काबुक्की सहन करावी लागते. बाप्पा तुझ्या दर्शनासाठी वर्षभर आम्ही आसुसलेले असतो. तुझ्या चरणावर मस्तक टेकवून कधी मनाची धन्यता पूर्ण करतोय यासाठीच प्रत्येक भक्ताचा अट्टाहास असतो. पण मानापमान , धक्काबुक्कीमुळे तुझ्या दर्शनाला जावे का ? असा हल्ली स्वतःला प्रश्न पडतो. बाप्पा जशी आम्हाला तुझी आस आहे तशी तुला देखील तुझ्या लाडक्या भक्ताची असणारच. तेव्हा सदैव तुझ्या दर्शनाच्या रांगेत तुडवले जाण्यापेक्षा तूच आम्हाला श्रीमंत कर ... इतका श्रीमंत की तुझ्या चरणाजवळ पंधरा मिनिटे उभे राहून तुला डोळे भरून पाहता येईल. अशी श्रीमंती देशील ना रे बाप्पा .. माझ्या लालबागच्या राजा.

**- नीलेश पांडुरंग मोरे**

---

## 'मेलडी क्वीन' आशाताई...

गेली सात दशके आपल्या स्वरांनी चाहत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आणि असंख्य संगीत प्रेमींच्या हृदय सिंहासनावर अधिराज्य गाजवणाऱ्या जेष्ठ अष्टपैलू गायिका, मेलडी क्वीन आशा भोसले यांचा आज वाढदिवस. आशाताईंचा आज ९१ वा वाढदिवस आहे असे सांगितले तर कोणाचा विश्वासही बसणार नाही. कारण आपल्या आवाजाप्रमाणे कायम चिरतरुण असणाऱ्या आशाताईंमध्ये आजही वीस वर्षाच्या तरुणीला मागे पाडेल एवढी ऊर्जा आहे. वयाच्या ९१ व्या वर्षीही त्यांच्यात गाण्याची, स्वर उंचावण्याची क्षमता एवढी आहे की आजही त्यांच्या आसपास कोणतीही गायिका फिरू शकत नाही. आपल्या सात दशकांच्या संगीत कारकिर्दीत त्यांना भारतरत्न सोडता सर्वच पुरस्कार मिळाले. मागील वर्षी आशा भोसले यांना प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने महाराष्ट्र सरकारतर्फे गौरविण्यात आले तेंव्हा संगीत प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच भारतरत्न सचिन तेंडुलकर उपस्थित होते. आशा भोसले यांचे संगीत क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. आशा भोसले यांनी गेली सत्तर वर्ष संगीत कलेची जी सेवा केली आहे त्याचीच पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार. ८ सप्टेंबर १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताईंना संगीताचे बाळकडू त्यांच्या घरातच मिळाले. १९४३ साली माझा



बाळ या चित्रपटात दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेल्या चला चला नव बाळा... या गाण्याने आशाताईंनी चित्रपट गायनाला प्रारंभ केला. वयाच्या पंधराव्या वर्षीच म्हणजे १९४८ साली हंसराज बहल यांच्या चुनरिया या चित्रपटात सावन आया हे गाणे गाऊन त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. १९५३ साली बिमल रॉय यांनी त्यांना आपल्या परिणिता या चित्रपटातील गाणी गाण्याची संधी दिली. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली.

१९५४ साली राज कपूर यांनी बूट पॉलिश या चित्रपटात मोहम्मद रफी यांच्यासोबत नन्हे मुन्ने बच्चे तेरे मुठ्ठी मे क्या है गायला दिले. १९५६ साली सीआयडी हा चित्रपट आला या चित्रपटातील त्यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. १९५७ साली आलेल्या नया दौर या चित्रपटातील गाणी तर खूपच लोकप्रिय झाली आणि सर्वत्र आशाताईंचे नाव झाले. आशाताई हिंदी चित्रपट सृष्टीतील आघाडीची गायिका म्हणून नावारूपास आल्या. त्या काळातील सर्वच संगीतकारांची गाणी त्यांनी गायली. मागील सत्तर वर्षात असा एकही संगीतकार नसेल ज्यांनी आशाताईंना आपल्यासाठी गाण्याची विनंती केली नसेल. १९४८ पासून सुरू झालेला आशाताईंच्या संगीत कलेचा प्रवास आजही अखंडपणे सुरू आहे. आशा भोसले यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तामिळ, मल्याळम, इंग्रजी, रशियन अशा विविध भाषेत सोळा हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. त्यांनी एक हजारांहून अधिक चित्रपटासाठी गायन केले. हिंदी चित्रपटसृष्टीतील गायनासाठी त्यांना सात वेळा फिल्मफेअर पुरस्कार तर दोनवेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २००० साली त्यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्काराने तर २००८ साली मानाच्या पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. २०११ साली सर्वाधिक गाणी गाण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला. त्यांच्या या विश्वविक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये घेण्यात आली. आशा भोसले यांनी सर्वप्रकारची गाणी गायली आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीवर सुरवातीच्या काळात लता मंगेशकर यांचा वरचष्मा होता. तेंव्हा दुसऱ्या गायिकांना संधी मिळणे अवघड होते हे ओळखून त्यांनी वेगळा मार्ग पत्करला. ज्या प्रकारची गाणी लता मंगेशकर गायच्या त्या प्रकारची गाणी सोडून अन्य प्रकारची गाणी त्यांनी गायला सुरवात केली. यात पॉप तसेच पाश्चिमात्य सुरावट असलेल्या गाण्यांचा समावेश होता. त्या गाण्यांनी युवकांवर मोहिनी घातली. त्यांनी गायलेले गझल, मुजरे आणि भजनेही लोकप्रिय झाली. संगीतातला कुठलाही प्रकार त्यांनी गायचा सोडला नाही. आशा भोसले यांनी अनेक भाषेत गाणी गायली असली तरी त्यांनी मराठीत सर्वाधिक गाणी गायली आहेत ते स्वाभाविकही आहे त्यांचे बंधू हृदयनाथ मंगेशकर यांच्यासाठी त्यांनी अनेक गाणी गायली आहेत. मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजूनी, मी मज हरपून बसले ग ही त्यांची गाणी इतकी लोकप्रिय आहेत की अजूनही ती स्मरणात आहे. कुठल्याही कार्यक्रमात ही गाणी अजूनही म्हटली जातात. त्यांनी गायलेली सर्वच गाणी लोकप्रिय झाली आहेत. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या आशाताई म्हणजे आधुनिक काळातील एक आश्चर्य आहे. आशाताईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

---

## साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

कालचा दिवस म्हणजे ८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी समाज सुसंस्कृत बनून समाजाचे शिक्षणाच्या जोरावर मानवी कल्याण होऊन सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात. ज्ञानी लोकांपासून अज्ञानी लोकांची होणारी पिळवणूक, फसवणूक, शोषण आदीपासून मुक्तता व्हावी. निरक्षर लोकांना साक्षरतेची संधी मिळावी यासाठी राष्ट्रकुलच्या 'युनेस्को' या संघटनेने १९६५ साली जागतिक पातळीवर साक्षरता दिन साजरा करण्याची घोषणा केली व त्याच्या पुढच्या वर्षापासून ८ सप्टेंबरला जगभर ती प्रथा रूढ झाली. आज इतक्या वर्षांनंतरही युनेस्कोने सुरू केलेल्या जागतिक साक्षरता दिनाला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. युनेस्कोच्या व्याख्येनुसार साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे म्हणूनच युनेस्कोने जगभर साक्षरता अभियान राबवले. युनेस्कोने सुरू केलेल्या या साक्षरता अभियानाला जगभर चांगला प्रतिसाद मिळाला. भारतात सुद्धा या अभियानाचे चांगले फलित दिसून आले असून, एका आकडेवारीनुसार १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा भारताचा साक्षरता दर हा १२ टक्के इतकाच होता. १९९१ मध्ये साक्षरतेचे हे प्रमाण ५२ टक्क्यांवर आले तर २०११ मध्ये ते ७५.०६ वर पोहचले. पण आपला देश अजूनही १०० टक्के साक्षर नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी १०० टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, बिहार या उत्तरेकडील राज्यात अजूनही साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही त्यामानाने केरळसह दक्षिणेकडील सर्व राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत. सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान भोजन योजना, प्रौढ शिक्षण योजना, राजीव गांधी साक्षरता अभियान, नवभारत साक्षरता अभियान या सारखे उपक्रम राबवून सरकार देशातील साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू.

७ वृत्तमानस
मुंबई-क्रीडा
मुंबई, सोमवार, ९ सप्टेंबर २०२४

*मुंबई : मुंबई येथील राजा शिवाजी विद्यालय संकुलातील भाई वैद्य सभागृहात नुकतेच भारतातील सर्वात जुनी व नामवंत पोस्टल कर्मचारी सोसायटी च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आंतरराष्ट्रीय स्तरावर मैत्री व सद्धभावनेचा संदेश देणाऱ्या भारत बांगलादेश सद्धवना सायकल विरांचा सत्कार करण्यात आला.त्यात पुणे येथील पोस्ट मास्तर राजू गवारी व नाशिक मधील रेल्वे डाक सेवेचे खेळाडू रत्नाकर शेजवळ यांचा समावेश होता. या वेळी प्रमुख पाहुणे अधिक्षक डॉ. दीप शिखा मॅडम, सोसायटी अध्यक्ष राजेश सारंग, सचिव महेश सावंत संचालक मंडळ व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.*



# पॅरिस पॅरालिम्पिक- भारताने प्रथमच 29 पदके जिंकली; त्यात 7 गोल्ड

वृत्तसंस्था
■ पॅरिस

पॅरिस पॅरालिम्पिक-2024 मधील ऐतिहासिक कामगिरीसह भारताने 7 सुवर्णांसह 29 पदके जिंकून आपला प्रवास संपवला. 10 व्या दिवशी, शनिवार, 7 सप्टेंबर रोजी देशाला 3 पदके मिळाली. खेळांचा समारोप समारंभ आज (८ सप्टेंबर) रात्री साडेअकरा वाजता होणार आहे.

या पदकांच्या मदतीने भारत पदकतालिकेत 16 व्या स्थानावर आहे. देशाने 7 सुवर्ण, 9 रौप्य आणि 13 कांस्य पदके जिंकली. भारताची ही सर्वकालीन सर्वोत्तम कामगिरी आहे, याआधी देशाने टोकियोमध्ये 5 सुवर्णांसह 19 पदके जिंकली होती.

शेवटच्या दिवशी, भारताच्या भालाफेकपटू नवदीपने पुरुषांच्या F41 प्रकारात रौप्य पदक जिंकले. नवदीपला इराणचा ऍथलीट बीत सयाह सदेघच्या अपात्रतेनंतर सुवर्णपदक देण्यात आले. नवदीप व्यतिरिक्त, सिमरनने महिलांच्या T-12 प्रकारात 200 मीटर शर्यतीत प्रत्येकी एक कांस्यपदक जिंकले आणि नागालँडच्या होकातो सेमाने पुरुषांच्या शॉटपुटमध्ये प्रत्येकी एक कांस्यपदक जिंकले. 22 वर्षांपूर्वी एका दहशतवादी चकमकीत त्याने डावा पाय गमावला होता.

## दहशतवादी चकमकीत पाय गमावलेल्या नागालँडच्या होकातोला ब्रॉन्झ



ॲथलेटिक्समध्ये कमाल 17 पदके भारताने टोकियोमध्ये 19 पदके जिंकली होती, यावेळी 17 पदके एकट्या ऍथलेटिक्समध्ये आली. खेळाडूंनी 4 सुवर्ण, 6 रौप्य आणि 7 कांस्य पदके जिंकली. बॅडमिंटन हा दुसरा सर्वोत्कृष्ट खेळ असताना त्याला 1 सुवर्ण, 2 रौप्य आणि 2 कांस्य पदके मिळाली.

पॅरा तिरंदाजीमध्ये भारताला प्रथमच सुवर्णपदक मिळाले, हरविंदर सिंगने ही कामगिरी केली. राकेश कुमार आणि शीतल देवी या जोडीने तिरंदाजीतही कांस्यपदक पटकावले. नेमबाजीत 1 सुवर्ण, 1 रौप्य आणि 2 कांस्य पदके मिळवली. याशिवाय ज्युदोमध्ये प्रथमच कांस्यपदक मिळवले.

शेवटच्या दिवशीचे पदक विजेते... 1. इराणी ॲथलीट अपात्र ठरल्यानंतर नवदीपला सुवर्ण मिळाले पुरुषांच्या F41 प्रकारातील अंतिम फेरीत भारताच्या नवदीपने रौप्यपदक जिंकले, परंतु इराणचा खेळाडू अपात्र ठरल्यानंतर त्याला सुवर्णपदक मिळाले. नवदीपने तिसऱ्या प्रयत्नात 47.32 मीटरची सर्वोत्तम थ्रो केला. हा पॅरालिम्पिक विक्रम राहिला, पण त्यानंतर इराणच्या सदेघ सयाहने 5व्या प्रयत्नात 47.64 मीटरची सर्वोत्तम थ्रो केला.




***मुंबई : माजी मंत्री आणि काँग्रेस नेते नसीम खान यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे राज्यात 18 सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद उन नबीच्या निमित्ताने सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याची मागणी केली आहे. ईद-ए-मिलाद हा इस्लाम धर्मातील महत्त्वाचा सण आहे, जो पैगंबर हजरत मुहम्मद यांच्या जन्मदिनाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. नसीम खान यांनी या दिवशी राज्यातील मुस्लिम समुदायाच्या धार्मिक भावनांचा विचार करून सुट्टी जाहीर करण्याचे आवाहन केले आहे.***

# मुलुंडमध्ये हिट अँड रन, एकाचा मृत्यू

प्रतिनिधी
■ मुंबई

रस्त्यावर फलक लावणाऱ्या दोन गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांना भरधाव वेगात असलेल्या एका बीएमडब्ल्यू मोटारगाडीने जोरदार धडक दिल्याची घटना शनिवारी पहाटे मुलुंड परिसरात घडली. या अपघातात एका कार्यकर्त्याचा मृत्यू झाला असून दुसऱ्याची प्रकृती गंभीर आहे.

मुलुंडच्या गव्हाणपाडा येथील आकृती टॉवरजवळ शनिवारी पहाटे ही घटना घडली. तेथील मुलुंडचा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या गणेश मंडळाच्या मंडपाजवळ प्रीतम थोरात आणि प्रसाद पाटील हे कार्यकर्ते पहाटे चार वाजण्याच्या सुमारास मंडळाचे फलक लावत होते. त्याचवेळी भरधाव वेगात एक बीएमडब्लू मोटारगाडी मुलुंड पूर्वेकडे जात होती. त्यावेळी चालकाचे अचानक गाडीवरील नियंत्रण सुटले आणि त्या गाडीने दोघांना जोरदार धडक दिली. धडक दिल्यानंतर चालकाने मदत न करताच घटनास्थळावरून पोबारा केला.

मंडळाच्या इतर कार्यकर्त्यांना याची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन दोघांना रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच प्रीतम थोरात यांचा मृत्यू झाला होता. प्रसाद पाटील यांची प्रकृती गंभीर आहे. याबाबत मुलुंड पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

# क्रिकेटमध्ये जय हो...



**सुहास जोशी**
**ज्येष्ठ क्रीडा पत्रकार**

गेली काही वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेट विश्वात मैदानात आणि मैदानाबाहेर भारताचा दबदबा राहिला आहे. भारतीय क्रिकेट संघाने आंतरराष्ट्रीय सामन्यात अनेक शानदार विजय मिळवून स्वतःचे असे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. तर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेमध्ये देखील महत्त्वाच्या पदावर अनेक भारतीयांनी स्थान मिळवून तेथे देखील भारतीय क्रिकेटची उंची वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. बीसीसीआयचे युवा सचिव ३५ वर्षीय जय शहा यांची नुकतीच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. हे अध्यक्षपद भूषविणारे शहा हे आयसीसीचे सर्वात युवा अध्यक्ष ठरणार आहेत. या अगोदर भारताच्या जगमोहन डालमिया, शरद पवार, एन. श्रीनीवासन, शशांक मनोहर यांनी हे आयसीसीचे मानाचे पद भूषविले होते.२००९ साली अहमदाबाद क्रिकेट संघटनेत कार्यकारीणी सदस्य म्हणून जय शहा यांनी प्रवेश केला.

त्यानंतर अवघ्या १५ वर्षांच्या छोट्या कालावधीत त्यांनी एकदम आयसीसीच्या अध्यक्षपदी झेप घेतली. सुरुवातीच्या काळात केंद्रीय गृहमंत्री अमीत शहा यांचे चिरंजीव हीच जय यांची ओळख होती. परंतु त्यानंतर आपल्या उत्तम प्रशासकीय कामकाजाचा ठसा जय यांनी उमटवून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. जास्त प्रसिद्धीच्या झोतात न राहता जय आपले कामकाज करतात हीच त्यांची ख्याती झाली आहे. अहमदाबाद क्रिकेट संघटनेतील प्रवेशानंतर अनेक मोठी पदे घेत आता ते लवकरच आयसीसीच्या अध्यक्षपदी विराजमान होणार आहेत. २००९ नंतर २०१३ मध्ये गुजरात क्रिकेट संघटनेचे जय सहसचिव झाले. त्यानंतर २०१५ साली बीसीसीआयच्या वित्त आणि विपणन समितीत जय यांना स्थान मिळाले. अहमदाबादमध्ये उभारण्यात आलेले जगातील सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियमच्या जडणघडणीत जय शहा यांचा मोठा वाटा राहिला आहे. सप्टेंबर २०१९मध्ये बीसीसीआयच्या सचिवपदाची मोठी जबाबदारी जय यांच्या खांद्यावर आली. त्यावेळी माजी कसोटीवीर आणि भारताचा कर्णधार सौरव गांगुली बीसीसीआयच्या अध्यक्षपदी होते.

२०२१मध्ये आशियाई क्रिकेट कौउंसिलचे अध्यक्ष म्हणून जय निवडून आले. २०२२ मध्ये आयसीसीच्या वित्त-वाणिज्य समितीत जय यांना स्थान मिळाले. २०२०-२०२१ या करोनाच्या कठीण काळात शहा यांच्या मार्गदर्शनाखाली आयपीएलचे यशस्वी आयोजन करण्यात आले. जैव सुरक्षित वातावरणात ही स्पर्धा घेण्यात आली. करोनाचा भारतातील प्रभाव वाढल्यानंतर मधे काही काळ लीग थांबविण्यात आली होती. परंतु नंतर युएईमध्ये याच उर्वरित सामन्यांची स्पर्धा होऊन आयपीएलचे यशस्वीपणे पूर्तता झाली होती. करोनाच्या त्या काळात क्रिकेटविश्वातील इतर देशात होणाऱ्या लीग थांबविण्यात आल्या होत्या, परंतु त्याही परिस्थितीत आयपीएलचे यशस्वी आयोजन करून जय यांनी आपल्यात असलेल्या उत्तम नेतृत्त्व गुणांची चमक दाखविली होती.

आपल्या सचिव पदाच्या काळात शहा यांनी काही धडाडीचे निर्णय घेतले. देशांतर्गत होणाऱ्या स्थानिक महत्त्वाच्या स्पर्धात सर्वच खेळाडूंना खेळणे बंधनकारक करण्यात आले. जे खेळाडू खेळणार नाहीत त्याच्यावर कठोर कारवाईचा बडगा देखील उंचलण्यात आला. याच कारणामुळे श्रेयस अय्यर, इशान किशन यांना करारबद्ध खेळाडू यादीतून वगळण्याचा धाडसी निर्णय शहा यांनी घेतला. पुरुषांप्रमाणेच महिला क्रिकेटपटूंना देखील प्रोत्साहन देण्यासाठी महिलांची आयपीएल लीग दोन वर्षापूर्वी सुरु करण्यात आली. २२ ऑक्टोबर २०२२ मध्ये पुरुष आणि महिला भारतीय क्रिकेट पटूंना समान मानधन देण्याचा निर्णय देखील शहा यांचाच होता. बंगळुरु येथील नॅशनल क्रिकेट अॅकॅडमीची नव्याने उभारणी करण्यात शहा यांचे मोठे योगदान होते. तसेच २०२२ मध्ये आयपीएलच्या प्रसिद्धी माध्यमांच्या ५ वर्षांच्या हक्कासाठी बीसीसीआयला तब्बल ४८,३९० कोटी रुपये भरभक्कम रक्कम मिळाली होती. या बोलीसाठी शहा यांचे नियोजन यशस्वी ठरले.

२०२१मध्ये भारतात त्यांच्याच नेतृत्त्वाखाली बीसीसीआयने टी-२० वर्ल्डकपचे यशस्वी आयोजन केले होते. हनुमान भक्त असलेले जय शिस्तप्रिय आणि साधी राहणी असाच त्यांचा लौकिक आहे. ते यशस्वी उद्योजक देखील असून आज त्यांची मालमत्ता सव्वाशे कोटी रुपये आहे. निरमा विद्यापिठातून जय यांनी बीटेकची डिग्री घेतली. २०१५ मध्ये आपली कॉलेज मैत्रिण असणाऱ्या रितीशाशी जय विवाहबद्ध झाले. जय यांची आयसीसी अध्यक्ष पदी निवड झाल्यानंतर भारतीय क्रिकेट वर्तुळात त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. अनेक आजी-माजी भारतीय क्रिकेटपटूंनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले. उत्तम प्रशासक आणि चांगल्या नेतृत्त्वाची क्षमता शहा यांच्यात असल्यामुळे ते आयसीसीचा कारभार नव्या उंचीवर नेऊन ठेवतील असा विश्वास भारतीय खेळाडूंनी व्यक्त केला आहे.

आशियाई आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत क्रिकेटच्या समावेशासाठी शहा यांच्या नेतृत्त्वाखाली बीसीसीआयने किल्ला लढवला होता. बीसीसीआयचा तो लढा यशस्वी होऊन दोन्ही स्पर्धात क्रिकेट खेळाचा समावेश करण्यात आला होता. आता बीबीसीआयच्या युवा अध्यक्षांसमोर भावी काळात मोठी आव्हाने आहेत.त्याला ते कसे सामोरे जातात हे बघणे महत्त्वाचे ठरेल. कसोटी क्रिकेट सामने जीवंत ठेवण्यासाठी आयसीसीला ठोस पावले भविष्यात उचलावी लागणार आहेत. ऑलिंपिकमध्ये क्रिकेट खेळाच्या समावेशासाठी आयसीसीला सर्वस्व पणाला लावावे लागेल. क्रिकेटची लोकप्रियता इतर देशात वाढविण्यासाठी अधिक जोमाने प्रयत्न करावे लागणार आहेत. कारण आजच्या घडीला आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळणारे फार कमी देश आहेत. काही मोजक्यात बलाढ्य देशांचा अपवाद वगळता इतर देशांच्या खेळाच्या दर्जात देखील सुधारणा करण्याचे मोठे आव्हान आयसीसीसमोर असेल. वाढते टी-२० आणि वन-डे सामने याचबरोबरीने कसोटी सामन्यांचा देखील समतोल राखण्यासाठी आयसीसला प्रयत्न करावे लागतील.

बीसीसीआयचे सचिव असताना आशिया चषक स्पर्धेसाठी पाकिस्तानला भारतीय संघ जाणार नाही असे शहा यांनी जाहीर करुन तो निर्णय देखील त्यांनी अंमलात आणला. त्यामुळे भारताचे या स्पर्धेतील सामने अन्यत्र हलवण्यात आले. आतामात्र पाकिस्तानमध्ये चॅम्पियन चषक क्रिकेट स्पर्धा होणार आहे. त्यातील भारताच्या सहभागाबाबतचा निर्णय शहांसाठी परीक्षा घेणारा असेल. येत्या १ डिसेंबररोजी शहा आयसीसीच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतील. सध्या न्युझीलंडचे ग्रेग बार्कली हे आयसीसीचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या दोन "टर्म" झाल्या असून ते तिसऱ्या "टर्म "साठी इच्छुक नसल्यामुळे शहा आयसीसीच्या अध्यक्षपदी विराजमान होतील. आयसीसी अध्यक्षपदी असताना डालमिया, पवार, श्रीनिवासन, मनोहर यांनी केलेल्या चांगल्या कामकाजाचा ठसा शहा देखील उमटवतील अशी आशा भारतीय क्रिकेटप्रेमी करतील.


AXIS FINANCE

## ॲक्सिस फायनान्स लिमिटेड

(CIN U65921MH1995PLC212675)
ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - 400 025

**संदर्भ क्र. :- AFL/CO/2024-25/LEGAL/AUGUST/116** **22 ऑगस्ट 2024**

स्पीड पोस्ट / नोंदणीकृत ए. डी. / ईमेल
कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय

**प्रति,**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | **नीलंबर ऍग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड, (कर्जदार)**<br>येथे नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता आहे: युनिट क्रमांक S-157, दुसरा मजला, फॅन्टासिया मल्टिप्लेक्स आणि मनोरंजन कॉम्प्लेक्स, प्लॉट क्रमांक 47, से.-30, ए, वाशी, ठाणे,नवी मुंबई - भारत, 400703<br>येथे देखील:<br>दुकान क्रमांक-1203,12 वा मजला, हावरे इन्फोटेक पार्क, सेक्टर-30A, वाशी, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र – ४००७०३.<br>ईमेल-आयडी : neelamneragro@gmail.com | 2 | **श्री. हनुमंत दत्ताराम नांचे (सह-कर्जदार - 1 / गहाणखत - 1)**<br>नीलंबर ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड 4/409 चे संचालक पवन छाया को-ऑप.हो. सोसायटी लि., राजाभाऊ देसाई मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५.<br>येथे देखील:युनिट क्रमांक 2004, दुसरा मजला, ए विंग, अक्षर बिझनेस पार्क, फेज I, प्लॉट क्रमांक 3, सेक्टर 25, वाशी, नवी मुंबई - 400 703.<br>येथे देखील:युनिट क्र. ३०३३, तिसरा मजला, के विंग, अक्षर बिझनेस पार्क, फेज I, प्लॉट क्रमांक ३, सेक्टर २५, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.<br>ईमेल-आयडी : neelamneragro@gmail.com |
| 3 | **श्रीमती हर्षदा हनुमंत नानचे (सह-कर्जदार - 2/ गहाणखत - 2)**<br>नीलंबर ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड 4/409 चे संचालक पवन छाया को-ऑप. हौ. सोसायटी लि., राजाभाऊ देसाई मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५<br>येथे देखील:युनिट क्र. 2004, दुसरा मजला, ए विंग, अक्षर बिझनेस पार्क, फेज I, प्लॉट नंबर 3, सेक्टर 25, वाशी, नवी मुंबई - 400 703<br>येथे देखील:युनिट क्रमांक ३०३३, तिसरा मजला, के विंग, अक्षर बिझनेस पार्क, फेज I, प्लॉट क्रमांक ३, सेक्टर २५, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३ | | |

प्रिय महोदय / महोदया,

**विषय: सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या कलम 13 (2) अंतर्गत सूचना (वेळोवेळी सुधारित केल्यानुसार) आणि त्याअंतर्गत केलेले नियम**

मी, ॲक्सिस फायनान्स लिमिटेडचा प्राधिकृत अधिकारी (यापुढे "एएफएल / सुरक्षित कर्जदार" म्हणून संदर्भित), कंपनी कायदा, 1956 च्या तरतुदीनुसार समाविष्ट केलेली कंपनी आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, 1934 अंतर्गत नोंदणीकृत नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी आहे त्याचे नोंदणीकृत कार्यालय ॲक्सिस हाऊस, ॲक्सिस फायनान्स, तळमजला, सी-2, वाडिया इंटरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - 400025, याद्वारे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत ही सूचना देतो., (यापुढे "सरफेसी कायदा" म्हणून संदर्भित) खालीलप्रमाणे :

एएफएलने, त्याच्या व्यवसायाच्या सामान्य वाटचालीत, कर्जदाराच्या विनंतीनुसार, रक्कम रु. 8,77,01,230/- रुपये आठ कोटी बहात्तर लाख एक हजार दोनशे तीस फक्त (एकत्रितपणे) करिता ("क्रेडिट सुविधा") त्यात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीवर अनुक्रमे शिल्लक हस्तांतरण आणि मालमत्तांवरील कर्जाच्या उद्देशाने दोन मुदत कर्ज सुविधा मंजूर केल्या.

1. त्या अनुषंगाने, तुम्ही कर्जदार, सह- कर्जदार आणि गहाणदार म्हणून तुमच्या क्षमतेनुसार तारण कर्ज करार दिनांक 06.04.2023, 17.06.2023 आणि 09.11.2023 ("सुविधा करार") यावर स्वाक्षरी केली आणि त्याची अंमलबजावणी केली. उपरोक्त सुविधा करारांतर्गत देय असलेल्या सर्व रक्कम आणि परिणामी, कर्जदाराने घेतलेल्या क्रेडिट सुविधेच्या परतफेडीसाठी संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे उत्तरदायी बनले आहेत. तुम्ही पत्ता धारक समान मासिक हप्त्यांमध्ये क्रेडिट सुविधेची परतफेड करण्याचे मान्य केले होते. [सुविधा कराराच्या संदर्भात क्रेडिट सुविधेसाठी कार्यान्वित / सबमिट केलेली सुविधा आणि सुरक्षा दस्तऐवज यापुढे या सूचनेमध्ये एकत्रितपणे "व्यवहार दस्तऐवज " म्हणून संबोधले जातील]

२. उपरोक्त क्रेडिट सुविधेअंतर्गत देय असलेल्या सर्व रकमांच्या परतफेडीसाठी सुरक्षा म्हणून, 30.06.2023 आणि 16.01.2024 रोजी, गहाणदाराने क्रेडिट सुविधा सुरक्षत करण्याच्या हेतूने, गहाणखत तयार केले आणि त्यांचे सर्व हक्क, शीर्षक, जमिनीवरील / मालमत्तावरील व्याज येथे अनुसूची ए मध्ये अधिक तपशीलवार दिले आहे. [अनुसूची अ] मध्ये नमूद केलेली मालमत्ता यापुढे "सुरक्षित मालमत्ता" म्हणून संबोधली जाईल ]

३. येथे हे सांगणे उचित आहे की कर्जदार / गहाणदार, सह- कर्जदार कआणि सह – कर्जदार-1/ गहाणदार, सह- कर्जदार कआणि सह – कर्जदार-2 क्क्यांनी सुविधा कराराद्वारे एएफएल कडून अनुसूची ए मध्ये नमूद केलेली मालमत्ता गहाण ठेवून क्रेडिट सुविधा मिळवल्या आहेत आणि एएफएल च्या बाजूने त्याद्वारे सुरक्षित व्याज निर्माण केले आहे. अनुसूची ए मध्ये नमूद केलेली सुरक्षा ही सरफेसी कायद्याच्या कलम 2(1)(झेडसी) च्या अर्थामध्ये "सुरक्षित मालमत्ता" आहे.

४. तुमच्या विनंतीनुसार, एएफएल ने विविध तारखांना विशिष्ट सूचनांवर कर्जदाराला येथे अनुसूची बी मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे क्रेडिट सुविधा वितरित केल्या होत्या.

५. व्यवहार दस्तऐवजाच्या अटींनुसार, तुम्ही कर्जदार / गहाणदार आणि सह - कर्जदार क आणि क्कयांना या क्रेडिट सुविधेअंतर्गत थकबाकीची परतफेड करणे आवश्यक होते आणि पुढे तुम्हाला कर्जदार आणि सह - कर्जदार (ने) देखील सुविधा करार आणि त्यानंतरच्या संप्रेषण मध्ये नमूद केलेल्या पद्धतीने त्यावरील व्याज आणि कराराच्या दरांवर इतर शुल्क भरणे आवश्यक होते.

६. तथापि, तुम्ही कर्जदार / गहाणदार, सह- कर्जदार क आणि सह – कर्जदार-1// गहाणदार, सह- कर्जदार आणि सह – कर्जदार-2 क्क व्यवहार दस्तऐवजांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झालात आणि सुविधा करारांतर्गत देय रकमेची परतफेड करण्यात चूक केली. एएफएल ने तुम्हाला नमूद पत्ता धारकांना विविध सूचनांद्वारे सूचित केले होते, तथापि, आजपर्यंत, ते दुरुस्त केले गेले नाही किंवा थकित रकमेची परतफेड करण्यासाठी कोणतीही पावले उचलली गेली नाहीत.

७. या संदर्भात, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की तुम्ही पत्ता धारकाने सतत चूक केली असल्याने, कर्जदाराचे खाते रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या मालमत्तेच्या वर्गीकरणाशी संबंधित निर्देश / मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून दि. 03.08.2024 रोजी नॉन परफॉर्मिंग ॲसेट ("एनपीए" ) म्हणून वर्गीकृत झाले आहे.

८. येथे हे सांगणे अत्यावश्यक आहे की एनपीए म्हणून खात्याच्या वर्गीकरणाची वरील माहिती तुम्हाला एएफएल द्वारे 13.08.2024 रोजीच्या एनपीए सूचना पत्राद्वारे कळवली गेली होती.

९. सरफेसी कायद्याच्या तरतुदींनुसार, सुरक्षित कर्जदाराचे देय कर्ज हे सुरक्षित मालमत्तेवर सुरक्षित केलेले कर्ज आहे आणि तुम्ही कर्जदार असल्याने, गहाणदार आणि सह- कर्जदार 1 / गहाणदार आणि सह- कर्जदार-2 ने व्यवहार दस्तऐवजांच्या दृष्टीने/क्रेडिट सुविधा च्या नियमांनुसार अशा सुरक्षित कर्जाची परतफेड करण्यात चूक केली आहे.

१०. कर्जदार / गहाणदार, सह- कर्जदार I आणि सह - कर्जदार II द्वारे सुरक्षित कर्जदाराला देय असलेले आणि देय असलेले थकबाकी कर्ज दि. 08 ऑगस्ट 2024 नुसार रु. 8,77,01,230/- (रुपये आठ कोटी बहात्तर लाख एक हजार दोनशे तीस फक्त)हे अनुसूची सी येथे अधिक तपशीलवार वर्णन केले आहे.

११. उपरोक्त लक्षात घेता, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या कलम 13 (2) अंतर्गत, सुरक्षित कर्जदार कर्जदार/सह-कर्जदार / गहाणदार यांना ही वैधानिक नोटीस जारी करण्याचा अधिकार आहे. आणि याद्वारे तुम्हाला सर्व पत्त्यावर एकत्रितपणे आणि स्वतंत्रपणे सुरक्षित कर्जदार रकमेची/एकूण रु. 8,77,01,230/-(रुपये आठ कोटी बहात्तर लाख एक हजार दोनशे तीस फक्त) सोबत लागू व्याज, पुढील व्याज, डिफॉल्ट व्याज, प्रिमिया, खर्च, शुल्क इ. ची संपूर्ण थकबाकी भरण्याचे आवाहन करते. यासह 08 ऑगस्ट 2024 रोजी करारानुसार या तारखेपासून परतफेडीच्या तारखेपर्यंत, सरफेसी कायद्याच्या कलम 13 (2) अंतर्गत जारी केलेल्या या सूचनेच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत (साठ दिवसांच्या) क्रेडिट सुविधेचा आदर करणे, असे करण्यात अयशस्वी झाल्यास, सुरक्षित कर्जदारास या सरफेसी कायद्यांतर्गत तुम्हाला कोणत्याही संदर्भाशिवाय सुरक्षितता व्याजाच्या अंमलबजावणीचे अधिकार वापरण्यास प्रतिबंधित केले जाईल आणि खर्च आणि परिणामांच्या बाबतीत पूर्णपणे तुमच्या जोखमीवर असेल.

१२. या तारखेपासून 60 दिवसांची मुदत संपल्यावर आणि मागणीचे पालन करण्यात अपयश आल्यावर, सुरक्षित कर्जदार सरफेसी कायद्यांतर्गत खालील उपाययोजना करेल:
ए. यासह अनुसूची ए मध्ये नमूद केल्याप्रमाणे ते पूर्ण करण्यासाठी भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार यांसह सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला जाईल.
बी. सरफेसी कायद्याचे कलम 13 (4) (बी) आणि कलम 15 मधील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचा अधिकार यासह तुमच्या व्यवसायाचे व्यवस्थापन ताब्यात घेण्यात येईल.
सी. सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करून ज्याचा ताबा एएफएल द्वारे घेतला जाईल.
डी. कोणत्याही वेळी लेखी नोटीस देऊन, कोणत्याही व्यक्तीने, ज्याने तुमच्याकडून कोणतीही सुरक्षित मालमत्ता मिळवली आहे आणि ज्याच्याकडून कोणतेही पैसे देय आहेत किंवा तुमच्याकडे देय होऊ शकतात त्यामुळे अशा व्यक्तीने सुरक्षित कर्ज भरण्यासाठी पुरेसा पैसा एएफएल ला भरणे आवश्यक आहे.

१३. मी सरफेसी कायद्याच्या कलम 13 (8) कडे तुमचे लक्ष वेधून घेतो, ज्याद्वारे तुम्हाला वर सांगितल्याप्रमाणे देय रकमेची रक्कम सर्व खर्च, शुल्क आणि खर्चासह सार्वजनिक लिलावासाठी किंवा सुरक्षित मालमत्तेची भाडेपट्टी, नियुक्ती किंवा विक्रीच्या मार्गाने हस्तांतरणासाठी सार्वजनिक किंवा खाजगी करारातून कोटेशन किंवा निविदा आमंत्रित करण्याची सूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपर्यंत किंवा त्याआधी सादर करण्याची संधी आहे.

१४. तुम्हा सर्वांना सूचित केले जाते आणि सावध केले जाते की सरफेसी कायद्याच्या कलम 13 (13) च्या तरतुदींनुसार, सुरक्षित मालमत्तेचे (येथे अनुसूची ए मध्ये नमूद केलेले) विक्री, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा सुरक्षित कर्जदाराच्या पूर्व लेखी संमतीशिवाय कोणतेही हस्तांतरण केले जाणार नाही. कृपया लक्षात घ्या की, सरफेसी कायद्याच्या कलम 29 अंतर्गत नियमांसह वाचलेल्या सरफेसी कायद्यामध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदीचे कोणतेही पालन न करणे / उल्लंघन करणे, शिक्षापात्र गुन्हा आहे.

१५. कृपया पुढे लक्षात ठेवा की ही वैधानिक सूचना सुरक्षित कर्जदाराच्या अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता जारी करण्यात आली आहे, ज्यामध्ये सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार योग्य आणि आवश्यक समजल्या जाणार्या कोणत्याही अन्य कायदेशीर कार्यवाही आणि / किंवा करारानुसार कार्यवाही किंवा दोन्हीचा समावेश आहे.

१६. मी याद्वारे स्पष्टपणे संबंधित व्यवहार दस्तऐवज, इतर कोणतेही संबंधित दस्तऐवज, कायद्यानुसार किंवा अन्यथा सर्व अधिकार राखून ठेवतो. या सूचनेमध्ये समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट किंवा आमच्याद्वारे कोणतीही कृती किंवा निष्क्रियता संबंधित व्यवहार दस्तऐवजांतर्गत आमचे कोणतेही वर्तमान किंवा भविष्यातील अधिकार किंवा उपाय किंवा यापैकी कोणतेही माफी, किंवा पूर्वग्रह किंवा अन्यथा विपरित परिणाम म्हणून कार्य करणार नाही. कायदा किंवा सामान्यतः, जो कायम आहे आणि पूर्ण शक्ती आणि प्रभावाने चालू राहील.

१७. ही सूचना जारी करण्यासाठी आणि सरफेसी कायद्यांतर्गत सुरक्षित कर्जदाराच्या वतीने नियमांसह वाचलेले अधिकार करण्यासाठी अधोस्वाक्षरी केलेल्या प्राधिकृत अधिकारी म्हणून अधिकृत आहे.

१८. या सूचनेची पावती आपण कळवावी ही विनंती. या नोटीसची प्रत भविष्यातील संदर्भासाठी आमच्या कार्यालयात ठेवली जात आहे.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**ॲक्सिस फायनांस लिमिटेड**

**अनुसूची अ**
**सुरक्षित मालमत्तेचे तपशील**
**मालमत्ता - 1**

युनिट क्रमांक ३०३३, तिसरा मजला, के विंग, २७७२.७४ चौ.फूट. कार्पेट क्षेत्र. "अक्षर बिझनेस पार्क" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये भूखंड क्रमांक 3, सेक्टर 25, गाव – वाशी, नवी मुंबई, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र – 400 703 येथे नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत आणि वसलेले आहे. नोंदणी जिल्हा – ठाणे, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ("सांगित मालमत्ता" / "मालमत्ता - 1").

**मालमत्ता – २**

युनिट क्रमांक 2004, दुसरा मजला, ए - विंग, फेज - 1, वापरण्यायोग्य चटई क्षेत्र 3220.24 चौ.फूट. "अक्षर बिझनेस पार्क" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये भूखंड क्रमांक 3, सेक्टर 25, गाव – वाशी, नवी मुंबई, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र – 400 703 येथे नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत आणि वसलेले आहे. नोंदणी जिल्हा – ठाणे, ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ("सांगित मालमत्ता" / "मालमत्ता - 2").

**अनुसूची बी**
**वितरणाचे तपशील**

**कर्ज खाते क्रमांक 0456MMA00009739**
ए. रु. 2,75,149/- मॅक्स लाइफ इन्शुरन्स कंपनी लि. ऍक्सिस बँक - A/c 131010200017408 कडे.
बी. रु. 3,4582/- मॅक्स लाइफ इन्शुरन्स कंपनी लि. कडील
सी. 2,76,00,000/- थलिया इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. - इंडसइंड बँक - A/c - 200002704321
डी. रु. 1,16,74,298/- नीलंबर ॲग्रोटेक प्रायव्हेट लिमिटेड - आयसीआयसीआय बँक लिमिटेड – 41905002769
ई. रु. 2,25,602/- प्रक्रिया शुल्कासाठी.

**कर्ज खाते क्रमांक 0456MMA00011862**
ए. रु. 2,02,000/- MAX LIFE Insurance CO LTD – ॲक्सिस बँक A/c 131010200017408 कडे.
बी. रु. 8,732/- ICICI जनरल - ॲक्सिस बँक - A/C - 923020000968434 कडे.
सी. रु. 4,43,64,050/- अक्षर डेव्हलपर्सकडे - HDFC बँक लिमिटेड - A/C क्रमांक 02587630001151.
डी. रु. 4,25,218/- प्रक्रिया शुल्कापोटी.

**कर्ज खाते क्रमांक 0456BLA00003505**
ए. रु. 17,042/- MAX LIFE INSURANCE CO LTD - ॲक्सिस बँक A/c 131010200017408 कडे.
बी. रु. 19,23,648/- नीलंबर ऍग्रोटेक प्रा. लिमिटेड - ICICI बँक लिमिटेड - A/C - 041905002769
सी. रु. 47,200/- प्रक्रिया शुल्कासाठी.

**अनुसूची सी**
**8 ऑगस्ट 2024 रोजीच्या थकीत रकमेचा तपशील**

**(रक्कम रुपये मध्ये )**

| अ. क्र. | मालमत्तेवर कर्ज | मूळ मर्यादा मंजूर | मूळ मर्यादा मंजूर | मूळ मर्यादा मंजूर | मूळ मर्यादा मंजूर - |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 0456BLA00003505 | 14,74,155/- | 14,74,155/- | 14,74,155/- | 14,74,155/- |
| 2 | 0456MMA00009739 | 3,87,18,738/- | 3,87,18,738/- | 3,87,18,738/- | 3,87,18,738/- |
| 3 | 0456MMA00011862 | 4,43,76,991/- | 4,43,76,991/- | 4,43,76,991/- | 3,87,18,738/- |
| **एकूण थकबाकी ८ ऑगस्ट २०२४ पर्यंत** | | | | | **8,77,01,230/-** |

टीप: - सुविधा करारामध्ये परिभाषित केल्यानुसार लागू व्याजदरावर व्याज.

